संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा





आपली निशाणी
तुतारी वाजविणारा माणूस

## परिवर्तन घडणार, नगर बदलणार

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) । काँग्रेस । शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मित्रपक्षांच्या महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार

| अ. क्रमांक | उमेदवाराचे नाव | फोटो | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | अभिषेक बाळासाहेब कळमकर<br>Abhishek Balasaheb Kalamkar | | |

तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमतांनी विजयी करा.

प्रकाशक : निलेश मालपाणी, अ.नगर शहर विधानसभा अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. १३.११.२०२४ | अंक नं. २१३ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020





खरेदी मस्त..बक्षिसे जबरदस्त!
खरेदी करा आणि जिंका
31 दिवस 21 लाखांची बक्षिसे
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

काबरा एक्सप्रेस
डेली A/C बस / अर्जंट पार्सल सर्विस • फुल लोड / पार्ट लोड सर्विस उपलब्ध
गुजरात — अहमदाबाद, सुरत, अंकलेश्वर, राजकोट, बडौदा, किम, आनंद, नवसारी, वलसाड, वापी, भरुच, जामनगर
मध्यप्रदेश — इंदौर, (राज महौला, तीन इमली) उज्जैन
महाराष्ट्र — मुंबई, (वसई, बोरीवली, अंधेरी, भिवंडी, वाशी) औरंगाबाद, नाशिक, पुणे
राजस्थान — उदयपुर, अजमेर, जयपुर, दिल्ली, मोरी गेट
साऊथ — बंगलोर, हैदराबाद, गोवा
अहमदनगर — नेवासकर पेट्रोल पंपासमोर, मार्केटयार्ड चौक, स्टेशन रोड
7972872112



शाळा / कॉलेजमध्ये आपल्या पाल्यांच्या
सुरक्षेबाबत निश्चिंत व्हा...
ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
98222 94622 | 94220 87757
Swami Vivekanand Chowk, Gujar Galli, Ahmednagar



जगप्रसिद्ध नामांकित ब्रॅण्डचे दर्जेदार होम अप्लायंसेस एकाच छता खाली...
• फ्रिज • ए.सी. • वॉशिंग मशिन • एलईडी टीव्ही • होमथिएटर • मोबाईल • होम अप्लायन्सेस
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
COMPRO Systems & Services
HDB FINANCIAL SERVICES | BAJAJ FINSERV
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँक जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०
PHILIPS | LG | Whirlpool | SONY | SAMSUNG | KENSTAR | JVC | Electrolux


# संग्राम जगतापांची ‘हॅटट्रीक’ की अभिषेक कळमकर मारणार ‘बाजी’?

## ...तर स्व. अनिल राठोड यांच्यानंतर हॅटट्रीक करणारे जगताप ठरणार दुसरे आमदार

नगर – अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघात होऊ घातलेली २०२४ ची निवडणूक ही १६ वी असून या निवडणुकीत विद्यमान आमदार संग्राम जगताप हॅटट्रीक करणार की अभिषेक कळमकर बाजी मारणार याकडे शहरातील जनतेचे लक्ष लागले आहे. जगताप यांनी हॅटट्रीक केल्यास या मतदारसंघातून सलग तीनवेळा निवडून येणारे ते दुसरे आमदार ठरणार आहेत.

अहमदनगर शहर मतदारसंघाचा मागोवा घेतल्यास स्व. अनिल राठोड यांनी सर्वाधिक पाचवेळा आणि तेही सलग निवडून येऊन शहराचे प्रतिनिधीत्व केले आहे. या पाच निवडणुकांमध्ये चार निवडणुकीत त्यांचे प्रतिस्पर्धी ज्येष्ठ नेते दादाभाऊ कळमकर हेच राहिले आहेत. दादाभाऊ कळमकर यांनी १९८५ ची निवडणूक जिंकल्यानंतर १९९० ते २००४ या सलग चार निवडणुकीत त्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. तर स्व. राठोड यांनी १९९० ते २००९ पर्यंतच्या पाचही विधानसभा निवडणुका सलग जिंकल्यानंतर २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत त्यांना सलग दोन वेळा पराभवाचा सामना करावा लागला होता. या दोन्ही निवडणुकीत आ. संग्राम जगताप यांनी विजय मिळवला असल्याने ते आता २०२४ मध्ये हॅटट्रीकच्या तयारीत आहेत.





शहर मतदारसंघात १९५१ च्या पहिल्या निवडणुकीत कुटे विठ्ठल गणपत यांनी काँग्रेसच्या तिकीटावर विजय मिळवला होता. त्यानंतर १९५७ आणि १९६२ मध्ये त्र्यंबक शिवराम भारदे यांनी काँग्रेसच्या तिकीटावर सलग दोन वेळा शहराचे प्रतिनिधीत्व केले. १९६७ मध्ये एस. व्ही. निसळ हे शहराचे आमदार झाले. १९७२ मध्ये नवनीतभाई (नारायणदास) बार्शीकर यांनी अपक्ष निवडणूक लढवत काँग्रेसच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावला. बार्शीकर यांनी या निवडणुकीत काँग्रेसच्या कलाबाई रानडे यांचा पराभव केला. १९७८ मध्ये कुमार सप्तर्षी निवडून आले पण त्यांना अवघे दोन वर्षाचाच कालावधी मिळाला. त्यानंतर १९८० मध्ये झालेल्या निवडणुकीत काँग्रेसचे असिर शेख मोहम्मद ईस्माईल यांनी विजय मिळवला. त्यानंतर १९८५ च्या निवडणुकीत भारतीय काँग्रेस (समाजवादी) च्या तिकीटावर दादाभाऊ कळमकर हे आमदार झाले. पुढे १९९० च्या निवडणुकीत शिवसेनेचे शहरातील प्राबल्य वाढले आणि अनिल राठोड हे पहिल्यांदा शहराचे आमदार झाले. राठोड यांनी आमदारकी मिळविल्यानंतर मागे वळून पाहिले नाही. नगर शहर आणि शिवसेना हे एक अभेद्य समिकरण बनून गेले. त्याच बळावर राठोड यांनी १९९० व १९९५ च्या निवडणुकीत काँग्रेस उमेदवार व १९९९ व २००४ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार राहिलेल्या दादाभाऊ कळमकर यांचा पराभव केला. २००९ च्या निवडणुकीत सुवालाल गुंदेचा यांचा पराभव करत राठोड यांनी बाजी मारली. सलग पाचवेळा निवडणुका जिंकणाऱ्या अनिल राठोड यांचा राष्ट्रवादीच्या संग्राम जगताप यांनी २०१४ मध्ये पहिल्यांदा पराभव केला आणि त्यापुढील २०१९ च्या निवडणुकीतही राठोड यांना पराभवाला सामोरे जावे लागले.

आता २०२४ च्या निवडणुकीत दादाभाऊ कळमकर यांचे पुतणे अभिषेक कळमकर मैदानात उतरले आहे. कळमकर कुटुंबाची ही सहावी निवडणूक असणार आहे. दादाभाऊ पाचवेळा विधानसभा लढले त्यात एक विजय आणि चार पराभव त्यांच्या वाट्याला आले. आता पुतण्या अभिषेक कळमकर यांच्यासाठी जनता विधानसभेचे दरवाजे खुले करणार की संग्राम जगताप यांच्यावरील विश्वास अधिक दृढ होऊन ते हॅटट्रीक करणार हे २३ नोव्हेंबर रोजीच स्पष्ट होणार आहे.

# नगरमध्ये गर्भवती असलेल्या गोवंशीय जनावरांची कत्तल करून मृत अर्भक व मांसाचे तुकडे महापालिकेच्या कचरा गाडीत टाकले

## स्वच्छता निरीक्षकांच्या फिर्यादीवरून पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – गर्भवती असलेल्या गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोवंशीय मृत अर्भक महापालिकेच्या कचरा गाडीत टाकल्याची घटना मंगळवारी (दि.१२) दुपारी समोर आली. रामवाडी येथे घंटागाडीतून कॉम्पॅक्टरमध्ये कचरा ट्रान्सफर करत असताना हा प्रकार समोर आला. या प्रकरणी अज्ञात व्यक्ती विरोधात तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत महापालिकेचे सहाय्यक स्वच्छता निरीक्षक भरतसिंग सारवान (रा. भिंगार) यांनी फिर्याद दिली आहे. यामध्ये त्यांनी म्हंटले आहे की, झेंडीगेट परिसरात कचरा संकलन झाल्यानंतर मनपाची कचरा संकलन करणारी घंटागाडी रामवाडी परिसरात आल्यानंतर गाडीतील कचरा मोठ्या वाहनात भरला जात होता. यावेळी गोवंशीय जनावरांचे मृत अर्भक तसेच गोमांसचे मोठ मोठे तुकडे गोणीत बांधून त्यात टाकले असल्याचे समोर आले. ही बाब महापालिका अधिकाऱ्यांना आणि पोलिसांना कळविण्यात आली. उपायुक्त डॉ.संतोष टेंगले यांनी तात्काळ याबाबत पंचनामा करण्याचे आदेश दिले. त्यानुसार सहाय्यक स्वच्छता निरीक्षक भरतसिंग सारवान गुलाब गाडे, तुकाराम पांघरे यांनी २ पंचांच्या समक्ष पंचनामा केला.

या घटनेची माहिती मिळताच हिंदुत्ववादी संघटनेचे कार्यकर्ते दिगंबर गेंट्याल यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर सदर वाहन पोलिस ठाण्यात आणण्यात आले. महापालिकेचे स्वच्छता निरीक्षक भरतसिंग सारवान यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५ बी, ५ सी, ९, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३, २७१ नुसार गुन्हा दाखल केला आहे.



भिंगारमधून जाणाऱ्या नगर पाथर्डी मार्गांवर वाहतुकीचे नियम पायदळी तुडवत वाहतूक सर्रास सुरु असते.परिणामी मोठया प्रमाणात वाहतुकीची कोंडी पाहायला मिळते. रस्त्याच्या कडेला लावण्यात आलेल्या गाड्या, बाजूला मांडलेली दुकाने, फेरीवाले, विचित्र पद्धतीने लावलेली वाहने यामुळे सदरील मार्गांवर नेहमीच वाहतुकीची कोंडी होत असते. याठिकाणी अवजड वाहने, बसेस, चारचाकी वाहने व इतर छोटी मोठी वाहने यांची नेहमी वर्दळ असते. त्यातले त्यात रविवारी सुट्टी असल्यामुळे तर तोबा गर्दी असते. ही कोंडी एक प्रकारे ग्रहण असुन नागरिक त्रस्त झाले आहेत.स्थानिक प्रशासनाने यावर ठोस उपाय योजना करायला हवी पण असे काही होताना दिसत नाही. (छाया–सागर साळवे)


SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

पाहिजे
को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी करिता
मॅनेजर पाहिजे
संपर्क
9822024505

काय आपण आपल्या जुन्या अपार्टमेंटच्या इमारतीच्या Redevelopment / Self-redevelopment चा विचार करीत आहात?

एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली "(UDCPR) नियमांमुळे नगर शहरात जुन्या इमारतींचा पुनर्विकास (Redevelopment) मोठ्या प्रमाणात सुरु आहे किंवा होणार आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने काही मार्गदर्शक नियम तयार केलेले आहेत व त्या मार्गदर्शकांच्या अधीन राहूनच आपण आपल्या इमारतीचा पुनर्विकास करणे गरजेचे आहे. यासाठी इमारतींचा पुनर्विकास (Redevelopment) करण्यासाठी योग्य व माहितगार (PMC) सल्लागार असणे गरजेचे आहे. PMC (Project Management Consultant) म्हणून आम्ही आपणास इमारतीच्या पुनर्विकास ची पद्धत, त्यासाठी लागणारी कागदपत्रे, आपल्या अपार्टमेंटचा Feasibility Report तयार करुन जुन्या मूळ सभासदांना त्यांच्या हक्काचे होणारे फायदे मिळवून देणे, विकासक /ठेकेदार निवडण्याचे निकष, करारनामा कसा करावा, महारेरा नोंदणी इ .चे अचूक मार्गदर्शन व सल्ला आमची Team (Architect, CA, Structural Engineer, Legal Advisor, site Supervisor, etc) आपणास देईल तसेच आपल्या इमारतीचा पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होऊन राज्य सरकारने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सभासदांना वेळेवर ताबा मिळवून देण्यासाठी आमची Team आपल्या बरोबर राहील.

Er Prakash Jain B.E.(Civil) Mob : 9422220762
"Adarsh Consultancy"
( RERA & Redevelopment Consultant)
O-1, Adarsh Samruddhi Apt., Chowpatty Karanja, A'Nagar

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## नामदेवा तू भक्तिचंद्र आहेस– ज्ञानेश्वर माऊली

परमभक्त पुंडलिकाने वसवलेल्या भागवत धर्माची पताका सर्वदूर पोहोचवणाऱ्या संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलींसह संत श्री नामदेवांनी वारकरी संप्रदाय पुन्हा नव्याने समद्ध केला. माऊलींनी ज्ञानसूर्य तर नामदेवांनी भक्तिचंद्र बहरवला.

एकमेकांच्या संपर्कात आल्यानंतर त्यांनी केलेले कार्य केवळ अलौकिकच! नामदेवांबद्दल माऊली म्हणतात, ''नामदेवा, तुझी उत्स्फूर्त अभंगरचना आणि तुझी भक्ती! अनेक युगं त्याचा बोलबाला होत राहील. नामा तू साक्षात भक्तिचंद्र आहेस; कारण चंद्राची शीतलता आणि तेज तुझ्या भक्तीतही आहे आणि अभंगातही! ''तुझ्या भक्तीचा हा शीतल प्रकाश कित्येक युगं लोटली, तरी असाच तळपत राहील!''

''नामदेवा, सगळे कार्य म्हणजे मराठी सारस्वतांवर, विठ्ठलभक्तांवर, हजारो युगं ठसा उमटवणारं आहे. धन्य आहेस तू नामदेवा, धन्य तुझी भक्ती.







पंढरपूर निवासी नामदेव हे विठुरायाचे परम आवडते होते. त्यांनी त्याच्या हट्टाखातर नैवेद्य खाल्ला. नामदेवांच्या कीर्तनांचा गजर केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर गुजराथ, राजस्थान, पंजाबपर्यंत झाला होता. जातपात न पाळता, ईश्वराची भक्ती करता करता समाजाचं ऐक्य साधता येतं हे त्यांनी दाखवून दिलं. त्यांच्या भक्तिनिष्ठेने यवनी सत्तेलाही वाकवले.

सर्वसामान्यांना भक्तिमार्गाने, आत्मिक सामर्थ्य देऊन भागवत धर्माची पताका डौलाने फडकवणारे नामदेव खरोखरच सर्वसामान्यांना जवळचे आहेत.

# आपले भवितव्य घडविणाऱ्या 'उमेद'वाराची निवड करावी

सुज्ञ सुजाण मतदार बंधू आणि भगिनींनो...

उमेदवार हा शब्द फार्सी भाषेतून मराठीत आलेला आहे. त्याची खरी शब्द फोड आणि अर्थ उम्मीदे वारीस अशी आहे. ज्याच्यावर आपण पूर्ण विश्वास ठेवून, ज्याच्याकडून योग्य अपेक्षा ठेवून, आपला काळजीवाहू मुखत्यार म्हणून.. आपल्यातर्फे कार्यवाह म्हणून ज्याच्यावर विश्वासाने विसंबून राहू शकतो, आपलं भवितव्य घडवण्यासाठी ज्याची नेमणूक करू शकतो, अशा व्यक्तीला भाषाशास्त्रामध्ये आपला उमेदवार म्हणतात. इतकी मोठी छान व्याख्या उमेदवार या शब्दाची आहे.

जरा आजच्या देशभरातल्या उमेदवारांकडे आपण एक नजर मारली तर या व्याख्येत कोण आणि किती जण बसत आहेत? याचा पण विचार करू शकतो. या विधानसभेच्या निवडणुकीत जे उभे राहिलेले उमेदवार आहेत त्यांना स्वतःलाच कदाचित आपलं नेमकं काय काम असतं, ते कसं करायचं असतं? आणि आपण सगळ्यांचे मायबाप आहोत की सेवक, नोकर आहोत? हेच मुळात समजत नाही आणि अशा उमेदवारांना प्रचंड बहुमताने निवडून देणारे आपण...आपल्याला तरी कुठे काय माहित आहे? आपल्याला तर आपण देत असलेल्या बहुमोल मताची खरी किंमत सुद्धा माहित नाही.. काही विद्वानांनी मात्र त्यांच्या मताची किंमत ठरवून घेतली आहे. प्रत्येक मताला २०००/– काहींनी ठरवले आहेत.. प्रत्येक मताला एक चपटी आणि एक कोंबडी... त्यामुळे आपल्या लोकशाहीचा हा स्तंभ पूर्ण पूर्ण पोखरला गेला आहे.

ज्ञानेश्वर महाराज म्हणाले होते की, हे विश्वचि माझे घर आणि आता आपण फक्त त्या शब्दांची अदलाबदली केली आहे.. आपण असे म्हणतोय की.. हे घरची माझे विश्व... आपल्या घरा व्यतिरिक्त एक सुदृढ, परिसर, शहर, समाज एक सुदृढ भावी पिढी घडवण्यामध्ये आपण का बरं पूर्णपणे नापास होत आहोत.



**योग्य उमेदवार, मतदार जागृती अभियान...**

आपल्या मुलाचा किंवा मुलीचं लग्न करायचा असेल तर ते स्थळ पाहताना लाख चौकशा करतो, हेरगिरी करतो, सगळ्या प्रकारची माहिती मिळवतो कारण आपल्याला फक्त आपल्या मुलाची किंवा मुलीची भवितव्याची चिंता असते... पण आपली संपूर्ण पिढी आबाद किंवा बरबाद करू शकणाऱ्या आपल्या उमेदवाराबाबत आपण एवढे उदासीन का आहोत? याला कुठलीही परकीय शक्ती जबाबदार नाही याला कारण आहे आपली उदासीनता मी एकटा काय करू?

ही न्यूनगंडाची सोयीस्कर भावना आपल्याला निष्क्रिय बनवून टाकते, आणि दुसरी गोष्ट आपल्या समस्येचे मूळ आणि त्याचं समाधान हे एक सुज्ञ नागरिक म्हणून मनापासून आपण कधीही काहीही जाणून घेतलंच नाही, नागरिकशास्त्र हा विषय आपण फक्त शाळेत पेपर लिहून पास होण्यासाठी वाचला.. त्यात नेमकं काय वाचलं हे आज भल्या भल्या सुशिक्षित लोकांनाही सांगता येणार नाही. त्यामुळे वेगवेगळे कर, उपकर नावाची खंडणी आपण दरवर्षी मुकाट पणे देतो.. आणि जे फुकटे लोक आहेत त्यांना पोसत बसतो.. त्याचा जाब विचारण्याची देखील ताठरता आणि हिम्मत आपल्या पाठीच्या कण्यामध्ये राहिलेली नाही.

आपलं अहमदनगर शहर आता उगीचच राजकारणाच्या सोयीसाठी अहिल्यानगर जरी झालं असलं.. तरी हा बदल म्हणजे कागदावरचा फसवा बदल आहे.. त्याच तिकिटावर तोच खेळ चालू आहे.. तिकिटाचा फक्त रंग बदलला आहे... मुठभर लोक नाराज झाले.. मुठभर लोक खुश झाले..

शहराच्या भवितव्याचं काय? आपल्या पुढच्या पिढीचं काय?? आपलं काय??? आपल्या देशाचं काय? याचा विचार करायला कुणालाच वेळ नाही आणि इच्छाशक्ती देखील नाही.. नेहमी आजूबाजूच्या शहरांची तुलना करून आपण गप्पाष्टक रंगवत असतो.. नको नको त्या लोकांच्या समोर मान झुकवत असतो, आणि कधी जातीचा म्हणून कधी दहशत म्हणून तर कधी अमुक पक्षाचा म्हणून निवडून देत असतो... त्यामध्ये आपला षंढपणा निष्क्रियपणा, असा असतो की हा लोकप्रतिनिधी कसाही येडावाकडा असला तरी आपल्या कधीतरी कामाला येऊ शकतो, बाकीच आपल्याला काय देणे घेणे आहे?

देऊन टाकू त्याला मत..

पुढे मोठा मंत्री बिंत्री झाला तर कामाला येईल..

हाच स्वार्थी हेतू कारणीभूत असतो..

एक शायर म्हणतो..

जो कभी नही चलेगा, वह बडे बाजार मे आ जायेगा..

जो कभी नही होगा, वो अखबार मे आ जायेगा..

चोर उचकों का भी सन्मान करो दोस्तो..

क्यों की, न जाने कौन किसके सरकार मे आ जायेगा...

आपलं सरकार हे फक्त विधान सभेत नौटंकी करायला... खुर्च्या तोडायला, सभा त्याग करायला किंवा घोषणा द्यायला नसतं ते कणखर दूरदृष्टी असलेलं सरकार तुमच्या पिढीचं कल्याणकारी बनवणं.. तुमच्याच हातात आहे.. जागे व्हा मतदार बंधू भगिनींनो, जागे व्हा..

– **सुहास मुळे**, अध्यक्ष,
जागरूक नागरिक मंच,
मोबा. ९००२६६८५५५

## महापालिकेत ई ऑफिस प्रणालीच्या माध्यमातून ऑनलाईन कामकाज

**राज्यातील ''ड'' वर्ग महापालिकांमध्ये ऑनलाईन कामकाज करणारी पहिलीच महापालिका कामांचे प्रस्ताव, मंजुरीची प्रकरणे, निर्णयांची अंमलबजावणी जलदगतीने होणार : आयुक्त यशवंत डांगे**

नगर – इंटरनेटचा वाढता प्रसार आणि सरकारी सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्याच्या लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. ऑनलाईन कामकाजामुळे वेळेची बचत होऊन नागरिकांचे अर्ज, कामांचे प्रस्ताव, इतर प्रकरणांवर जलद निर्णय घेणे शक्य आहे. त्यामुळे अहिल्यानगर महानगरपालिकेत 'ई ऑफिस' प्रणाली कार्यान्वित करण्यात आल्याची माहिती आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.




अहिल्यानगर मनपामध्ये ई ऑफिस प्रणालीच्या माध्यमातून ऑनलाईन जारी करणारी मनपात अंमलबजावणी प्रसंगी आयुक्त यशवंत डांगे. समवेतक अधिकारी, कर्मचारी. सोबतच्या छायाचित्रात प्रणाली कार्यान्वित झालेली दिसत आहे.

कामकाजाला गती देण्यासाठी ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असून, यामुळे प्रशासकीय प्रस्ताव जलदगतीने मार्गी लागून नागरिकांची कामे वेळेत होतील, असा विश्वास आयुक्त यशवंत डांगे यांनी व्यक्त केला. अशी प्रणाली राबवून ऑनलाईन कामकाज करणारी अहिल्यानगर महानगरपालिका ही ड वर्ग महानगरपालिकांमध्ये पहिलीच पालिका ठरल्याचेही त्यांनी सांगितले.

आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून 'ई ऑफीस' प्रणाली राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभाग, आस्थापना विभाग, संगणक विभाग, भांडार विभाग या विभागांचे कामकाज तात्काळ ई ऑफीस प्रक्रियेने सुरू करण्यात आले. मंगळवारी आयुक्त यशवंत डांगे यांनी या प्रणालीचे उद्घाटन करून विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याकरीता सार्वजनिक सूट्टीचा आदेश डिजिटल स्वाक्षरी करून विभागांना ऑनलाईन जारी केला.

यावेळी उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे, डॉ. संतोष टेंगळे, सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, संगणक विभाग प्रमुख अंबादास साळी, शहर अभियंता मनोज पारखे, जलअभियंता परिमल निकम, शेखर बनकर, संतोष राठोड आदींसह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. ई–ऑफिस करीता महाराष्ट्र शासनाच्या वतीने विजय पाटील, जयेश खैरनार, गिरीश सुंकी यांचे सहकार्य लाभले

ई ऑफिस प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी या प्रणालीवर सर्व कर्मचाऱ्यांचे आयडी, डिजिटल स्वाक्षरी, कार्यालयातील आस्थापना तक्ता अद्ययावत करण्यात आला आहे. त्यानुसार सर्व सॉफ्टवेअर संगणक विभागाकडून अद्यावत करण्यात आले आहेत. ई ऑफिस प्रणालीमध्ये फाईल्सचा जलद गतीने निपटारा होणार आहे. वेगवेगळ्या स्तरावर फायलींच्या मंजुरी, त्यावर होणारा मनुष्यबळाचा खर्च, वेळेची बचत होऊन तात्काळ निर्णय होणार आहेत. या प्रणालीमध्ये कामकाज पेपरलेस होवून, फायली सांभाळण्याकरीता लागणारी यंत्रणा, त्यावर होणाऱ्या खर्चाची बचत तर होईलच, यासह फायली गहाळ होण्याचे टळतील, असे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले. दरम्यान, ई ऑफिस प्रणालीच्या माध्यमातून महापालिकेतील प्रशासकीय कामकाज पहिल्या टप्प्यात ऑनलाईन करण्यात येत आहे. सर्व विभागांचे कामकाज ई ऑफिस प्रणालीच्या माध्यमातून सुरळीत झाल्यावर दुसऱ्या टप्प्यात नागरिकांना ऑनलाईन सेवा सुरू करण्याचा प्रयत्न आहे. महापालिकेच्या माहिती व सुविधा केंद्राचे कामही ई ऑफिसच्या प्रणालीद्वारे ऑनलाईन करण्याचा प्रयत्न असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

## डिजीटल अटक केल्याचे भासवत डॉक्टरची ११.५० लाखांची फसवणूक

नगर – 'तुमचे मनीलॉंडरींग केसमध्ये नाव आले आहे, तुमच्या विरुध्द सुप्रीम कोर्टाची अरेस्ट ऑर्डर व आरबीआयचे बँक अकाउंट फ्रिज करण्याचे आदेश असल्याने तुम्हास डिजीटल अटक झालेली आहे', असे म्हणत संगमनेर येथील एका वृद्ध डॉक्टरला ११.५० लाखांना फसविल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी दोघांविरोधात सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आठवडा भरातील समोर आलेली ही दुसरी घटना असून मागील आठवड्यात नगर मधील एका महिला डॉक्टरने ही अशीच फिर्याद दिलेली आहे.

या घटनेत मोबाईल नंबर धारक विशाल सिंग (पुर्ण नाव, गाव माहीत नाही) व मुंबई पोलिस हेडकॉर्टर व्हॉटसअप नंबरधारक राजेश मिश्रा (पूर्ण नाव, गाव माहीत नाही) यांच्या विरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २६ ते ३० ऑक्टोबर दरम्यान ही घटना घडली. मोबाईल नंबरधारक विशाल सिंग व मुंबई पोलीस हेडकॉर्टर व्हॉटसअप नंबरधारक राजेश मिश्रा यांनी फिर्यादीला तुमचे आधारकार्ड हे मोबाईल नंबरला लिंक आहे. त्यावरुन अनेक लोकांना घाण मेसेज केलेले आहेत. तसेच नरेश गोयल यांच्या मनी लॉंडरींगच्या केसमध्येही तुम्ही सामील आहात, असे सांगून तुमच्या विरुध्द सुप्रीम कोर्टाची अरेस्ट ऑर्डर व आरबीआयची बँक अकाउंट फ्रिज करण्याची ऑर्डर निघालेली असल्याने तुम्हास डिजीटल अटक झालेली आहे. तुमच्या खात्यातील ११.५० लाख रुपये स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या खात्यावर पाठवा, तुमचे पैसे तुम्हाला ४८ तासात चौकशी पूर्ण करुन परत मिळतील, असे आरोपींनी त्यांना सांगितल्यावर त्यांनी त्यांना ऑनलाईन पैसे पाठविले. नंतर आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी नगरला सायबर पोलिस ठाण्यात येवून फिर्यादी दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपास पोलिस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम करत आहेत.

## गोरक्षनाथ गडावर १४ नोव्हेंबरला प्रकटदिन उत्सव

नगर – धार्मिक महत्व असलेल्या नगरजवळील मांजरसुंभा येथील गोरक्षनाथ गडावर १४ नोव्हेंबरला गोरक्षनाथ प्रकटदिन उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मंदिराचे अध्यक्ष ॲड. शंकरराव कदम यांनी दिली.



सकाळी ८ ते १० महापूजा व अभिषेक भाविक भक्तांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर सकाळी १० वा भागवताचार्य गोरक्षनाथ महाराज देठे, शास्त्री (लोणीकर) यांचे कीर्तन होणार आहे तर दुपारी १२ ते ३ यावेळेत रामदास पठारे, दत्तात्रय भुतकर व नाथ भक्ताच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे आहे.

कार्यक्रमाचे संयोजन ईश्वर महाराज कदम शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली व उंबरे भजनी मंडळ व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत होत आहे उत्सवा निमित्त पहाटेपासून दिवसभर मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात व दिवशभर दर्शनासाठी रांग लागलेली असते

गोरक्षनाथ ११ व्या ते १२ व्या शतका दरम्यान झालेले नाथ योगी होते. गोरक्षनाथांचे नावावरून नेपाळमधील गोरखा या नावाचा उगम आहे. गोरख जिल्ह्यात एका गुहेत गोरक्षनाथांचे एका पायाचे पद चिन्ह आहे. त्याची जन्मकथा अशी आहे मच्छिंद्रनाथ भारतभर भ्रमण करीत असे फिरत असता एका घरी भिक्षा मागण्यास गेले. त्या स्त्रीस संतती नव्हती. दारी आलेल्या तेज:पूंज साधूला भिक्षा वाढताना पुत्रप्राप्तीची कामना व्यक्त केली. मच्छिंद्रनाथांने त्या स्त्रीला चिमूटभर भस्म दिले व आशिर्वाद दिला. मुलगा होईल.

या स्त्रीने आपल्या शेजारणीला झालेली हकीकत सांगितली पण त्या हसू लागल्याने त्या स्त्रीने ते भस्म शेणाच्या ढिगावर टाकून दिले. बारा वर्षांनी मच्छिंद्रनाथ परत आले व मुलाची चौकशी केली तेव्हा मूल झालेच नाही असे त्या स्त्रीने सांगितले. सर्व हकिकत स्त्रीकडून ऐकून मच्छिंद्रनाथ शेणाच्या ढिगाऱ्याजवळ जाऊन चलो गोरक्ष म्हणून हाक मारली. त्या शेणातून मुलगा प्रगटला व म्हणाला 'आदेश' मग मच्छिंद्रनाथ त्याला घेऊन गेले.

येथील स्मृतीमंदिराचे काम पूर्ण झाले आहे. कार्यक्रमाला भाविकांनी उपस्थित राहावे असे आवाहन विश्वस्त मंडळ, मांजरसुंभा ग्रामस्थ यांनी केले आहे.

## आयुर्वेदिक औषधाचे दुकान फोडून रोख रकमेची चोरी; सीसीटीव्ही कॅमेऱ्यासह डिव्हीआरही चोरट्यांनी पळवला

नगर – शहरातील हातमपुरा, डावरे गल्ली भागातील आयुर्वेदिक औषधाचे दुकान फोडून चोरट्यांनी रोख रकमेची चोरी केली. तसेच जाताना दुकानात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यासह त्याचा डिव्हीआरही पळवल्याची घटना सोमवारी (दि.११) रात्री ९ ते मंगळवारी (दि.१२) सकाळी १० या कालावधीत घडली आहे.

याबाबत दुकान मालक विशाल गणेश होनराव (वय ४२, रा. विठ्ठल मंदिराजवळ डावरे गल्ली, हातमपुरा) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे डावरे गल्ली येथे विशाल आयुर्वेदिक औषधाचे दुकान आहे. सदर दुकान त्यांनी नेहमीप्रमाणे सोमवारी (दि.११) रात्री ९ च्या सुमारास दुकान बंद केले व ते घरी गेले. मंगळवारी सकाळी १० च्या सुमारास ते दुकान उघडण्यासाठी आले असता त्यांना दुकानाच्या शटरचे कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी दुकान उघडून पाहिले असता दुकानात उचकापाचक झालेली दिसली. त्यांनी दुकानाच्या कपाटात ठेवलेली रोख रक्कम पाहिली त्यावेळी टी आढळून आली नाही. तसेच चोरट्यांनी दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यासह त्याचा डिव्हीआरही सीसीटीव्ही कॅमेऱ्यासह त्याचा डिव्हीआरही चोरून नेल्याचे निदर्शनास आले. चोरट्यांनी दुकानातून एकूण ६६ हजारांचा ऐवज चोरीला गेला आहे. ही माहिती त्यांनी कोतवाली पोलिसांना कळविली.

पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. याबाबत विशाल होनराव यांच्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

## हॉटेलसमोरून मोटारसायकलची चोरी

नगर – हॉटेलसमोर लावलेली हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल (क्र. एम.एच.१६ बी जे ३६०१) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना एमआयडीसी परिसरातील सह्याद्री चौकातील हॉटेल अरुण समोर शनिवारी (दि.९) दुपारी ४ ते ५ वाजण्याच्या दरम्यान घडली आहे. याबाबत चंद्रभान तुकाराम भोसले (रा. नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (ब) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## विठ्ठल वडलाकोंडा यांचे अल्प आजाराने निधन

नगर – येथील गुलमोहोर रोडवरील नरहरीनगर (सावेडी) येथील रहिवासी विठ्ठल गंगाराम वडलाकोंडा (वय ७०) यांचे १२ रोजी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ भाऊ, भाऊजय, नातवंडे, पुतणे असा परिवार आहे.

## नामदेव करांडे यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर – दरेवाडी गावातील रहिवासी नामदेव दगडू करांडे उर्फ एन. डी. करांडे (दादा, वय ७७) यांचे १० नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्या मागे पत्नी, भाऊ, बहिणी, ६ मुली, २ मुले, सुना, जावई, नातवंडे, पुतणे असा परिवार आहे. ते मौजे दरेवाडी गावातील एमईएस कॉन्ट्रॅक्टर व माजी ग्रामपंचायत सदस्य होत.

## कुसुमबाई साबळे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – एकता कॉलनी आगरकरमळा येथील रहिवासी सौ. कुसुम सीताराम साबळे (वय ७३) यांचे १३ नोव्हेंबरला सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्या जिल्हा विशेष लेखा परीक्षक वर्ग १ सहकार खात्यातील सेवानिवृत्त शासकीय अधिकारी सीताराम बाबूराव साबळे यांच्या पत्नी तसेच अएसोच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल, अ.नगर मधील पर्यवेक्षक कैलास साबळे व शासकीय अधिकारी ग्रामविकास विभाग मंत्रालय, मुंबई महेश साबळे यांच्या मातोश्री होत.

त्यांच्या मागे पती, २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## माजी नगरसेवक शाहूराव गरुड यांचे अल्प आजाराने निधन

नगर – स्टेशन रोड, कोठी येथील रहिवासी व माजी नगरसेवक शाहूराव किसनराव गरुड (वय ८०) यांचे १३ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर सिद्धार्थनगर येथे दफनविधी (अंत्यसंस्कार) करण्यात आला.



त्यांच्या मागे ४ भाऊ, भाऊजया, १ मुलगी, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे. संदीप गरुड यांचे ते वडील होत.

## लिलावती भंडारी यांचे वृद्धापकाळाने निधन

भिंगार – येथील कुंभारगल्लीत राहणाऱ्या लिलावती सदाशिव भंडारी (वय ९२) यांचे १२ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर भिंगारच्या अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे ३ मुले, ६ मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. भिंगार येथील नामांकीत पैलवान सदाशिव तुकाराम भंडारी यांच्या पत्नी, राजेंद्र, ईश्वर, संजय भंडारी यांच्या त्या मातोश्री होत. राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे भिंगार शहराध्यक्ष शिवम भंडारी यांच्या त्या आजी होत.

## वत्सलाबाई डहाळे यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर – येथील वत्सलाबाई दत्तात्रय डहाळे (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रविंद्र एकनाथ बोऱ्हाडे यांच्या सासूबाई, प्रविण रविंद्र बोऱ्हाडे यांच्या आजी होत.

## नरेंद्र पाटणी यांचे हृदयविकाराने निधन

श्रीरामपूर – येथील नरेंद्र लालचंद पाटणी (वय ६३) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रोमीत पाटणी व सौ.सोना संदेश ठोळे (रा.नेवासा फाटा) यांचे वडील, शितल अभिजीत पाटणी यांचे चुलते, शौर्य व श्लोक पाटणी यांचे आजोबा, सतीश गोधा यांचे मेहुणे होत.

## चंद्रनिवास दायमा यांचे हृदयविकाराने निधन

श्रीरामपूर – येथील दायमा बंदूकवाला फर्मचे मालक चंद्रनिवास बाबुलाल दायमा (वय ६६) यांचे १२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कुणाल व कपिल दायमा यांचे वडील, रोहित गोपाल दायमा यांचे चुलते होत.



मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### जिऱ्याचे पाणी लाभदायक

फोडणीकरिता किंवा गरम मसाल्याकरिता प्रत्येकाच्या घरी जिरे हे वापरले जाते. पण या जिऱ्याचा फक्त फोडणीपुरताच वापर नसून, गर्भवती महिलांनाही होतो. गर्भवती महिलांनी जिऱ्याचे पाणी पिणे हे त्यांच्या आरोग्याकरिता लाभदायक असते.

## पाककला

### उपवासाचा डोसा

**साहित्य** – बटाट्याची उपवासाची सुकी भाजी, अडीच वाट्या (तीन कप) वरईचे निवडलेले तांदूळ, जिरे अर्धा टि-स्पून, मीठ, तूप, मिरची.

**कृती** – वरई तांदूळ चार तास पाण्यात भिजत घाला. उपसून मिक्सरमधून बारीक करून घ्या. तसेच झाकून ठेवा. चार/पाच तासांनी त्यात जिरे, थोडी वाटून घेतलेली मिरची, मीठ घालून चांगले कालवून घ्या. आचेवर तवा ठेवा. त्यावर तूप पसरून घाला. नेहमी प्रमाणे जसे डोसे करतात त्याप्रमाणे करा. भाजत आल्यावर त्यावर आधीच तयार करून ठेवलेली बटाट्याची सुकी भाजी घाला. डोसा गुंडाळून मोठ्या डिशवर काढा. गरम असतानाच खा.

## सौंदर्य

### ओठ चांगले ठेवण्यासाठी

प्रत्येक ऋतूमध्ये ओठ चांगले ठेवायचे असतील तर देशी गुलाबाच्या पाकळ्या पाण्यात भिजवून ओठांवर चोळाव्यात. रात्री झोपताना पेट्रोलिअम जेली किंवा अँटीसेप्टिक क्रीम ओठांना लावल्याने ओठ फाटणार नाहीत.

## सल्ला

पोटातील कृमी नष्ट होण्यास रोज चिमूटभर आवळापूड खावी.

## वास्तू

कुटुंब प्रमुखाने हॉलच्या मुख्य दरवाजाकडे तोंड करून बसावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १४ नोव्हेंबर २०२४

**वैकुंठ चतुर्दशी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, अश्विनी २४।३३ सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०६ वा. २६ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : चर्चा व ओळखीने कामे होतील. अनावश्यक घटनांची चर्चा करण्यात वेळ आणि ऊर्जा वाया जाईल. कलेत रुची राहील.

**वृषभ** : सामाजिक स्नेह मेळावे आणि रम्य सहली तुम्हाला आनंदी आणि रिलॅक्स करतील. कलेत रुची राहील. स्त्री वर्गाला लाभ, माता–पित्यांना ताण.

**मिथुन** : परिचितात लाभ होईल. शारीरिक तसेच मानसिकदृष्ट्या तुम्हाला खचल्यासारखे वाटेल. थोडा आराम करा. धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण कराल.

**कर्क** : वस्तू चोरीस जातील. कामे रेंगाळतील, दिवस आळसात जाईल. आयुष्याबद्दल उदासीन राहाल. धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण कराल.

**सिंह** : परिचितांवर खर्च शक्य, प्रवास टाळाल, हट्ट व आग्रह अंगलट येईल. तणावमुक्तीसाठी तुमच्या मुलांसोबत मौल्यवान वेळ घालवाल.

**कन्या** : वेळ वाया घालवाल. नव्या क्षेत्रात शिरकाव होईल, वेगळेपणा भाव खाऊन जाईल. अत्यंत व्यस्त दिवस असला तरी आरोग्य चांगले राहील.

**तूळ** : मातृचिंता सतावेल. जुने मित्र भेटतील. आपला मनमिळावू स्वभाव आज लाभ देईल. मागील उधारी व उसनवारी वसूल होईल.

**वृश्चिक** : आनंदाने खुशीने परिपूर्ण असा चांगला दिवस. नियोजनबद्धरित्या कामे केल्याने वेळ सत्कारणी लागेल. मागील उधारी वसुल होईल.

**धनु** : हेवे–दावे टाळा, स्वतः धावपळ करावी लागेल, नशिबावर अवलंबून राहिल्याने नुकसान. तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल.

**मकर** : आग्रही मत आणि अभ्यासू वृत्ती यश देणार आहे. वाद हे ठामपणे जिंकाल. व्यायामाची सुरुवात कराल. अती खाण्यावर नियंत्रण मिळवाल.

**कुंभ** : नवी वाट निवडाल. कर्जे देणे–घेणे टाळाल. खरेदीत मन रमेल. गरोदर स्त्रियांनी जमिनीवर चालताना विशेष काळजी घेण्याची गरज आहे.

**मीन** : दिवस ताणाचा, स्वतःची मते बनविल्याने नुकसान. देणगीचे वा अनुदान याबाबतचे काम होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**आई** : बंड्या आज काय शिकवले शाळेत.
**बंड्या** : लिहायला शिकवले.
**आई** : अरे वा छान! काय लिहिले?
**बंड्या** : काय माहीत? अजून वाचायला नाही शिकवले....

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

- गोसीखुर्द धरण कोणत्या नदीवर आहे? – वैनगंगा
- महाराष्ट्र पोलिस विभागाकडून कोणते मासिक प्रसिद्ध केले जाते? – दक्षता
- मराठी भाषेत किती व्यंजने आहेत? – ३४
- रामटेक येथे कोणते विद्यापीठ आहे? – कालीदास

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०४९ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७०४८ चे उत्तर



**आडवे शब्द :–** १) काळजीपूर्वक रक्षण; संगोपन ३) आराधना; पूजा ६) गळ्याची मागची बाजू; आदर ७) तपस्व्यांची राहण्याची जागा ८) ओकारी; उलटी; वांती १०) गणेश; गणपती; गजानन १३) दातांनी केलेला आघात; दंश १४) लग्न समारंभातील नवरदेवाकडील मंडळी १६) कट; कारस्थान १८) मोठी हातोडी १९) काही वनस्पतींना अणकुचीदार अवयव येतो; कंटक २०) मिठाई बनवून विकणारा

**उभे शब्द :–** १) जमलेल्या लोकांचा समूह २) स्त्रियांचा एक दागिना ३) आंदोलनाचा एक प्रकार ज्यात काहीही न खाता बसायचे असते ४) बेकरीत तयार होणारा एक पदार्थ ५) साल; वर्ष; शक ९) अग्र; नोक १०) खिडकी; वातायन; झरोका ११) बेकरीत तयार होणारा एक गोड पदार्थ १२) सोपे नसलेले; कठीण १३) धनुष्य; कानाची पाळ १५) लढाई, लढाईची जागा १७) पदार्थाचा उडालेला तुकडा १९) कारस्थान; कट

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : भीरुतेवर आत्म्याचा शानदार विजय हाच पराक्रम होय. – **एनियल.**

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### कोणते खाद्यतेल शरीरासाठी सर्वात चांगले आहे?

महाराष्ट्रात परंपरेने कोकणात खोबरेल व अन्यत्र भुईमूग तेल खाल्ले जाते. आम्ही घरी दोन्ही खातो. भारतात चारशे वर्षांपूर्वी म्हणे शेंगदाणा आला; तत्पूर्वी तिळाचे खाल्ले जात असे. तेल कुठलेही असू दे, आमचा निकष एकच; ते filtered च असावे; त्यात नैसर्गिक जीवनसत्त्वे असतात.

तेलावरून उठवलेली हाकाटी कारखानदार व व्यापाऱ्यांनी उठवली आहे; ती शुद्ध मतलबी, स्वार्थी आहे. त्याला बळी पडू नका. तेल दीर्घकाळ राहिल्यास खवट होते म्हणून ते शुद्ध (refine) करायला सुरुवात केली. ते शुद्ध करताना रसायने घालून अनेक तास उकळले जाते. त्यात त्यातील सर्व नैसर्गिक जीवनसत्त्वे नष्ट होतात आणि उरते ते नुसते तेल. मग त्यात कृत्रिम जीवनसत्त्वे घातली जातात. नैसर्गिक जीवनसत्त्वे शरीरात जवळ जवळ ८५% शोषले जातात व कृत्रिम फक्त १५%. ती सुद्धा शरीराला कितपत योग्य असतात देव जाणे. याचा अर्थ एकच. शरीराला मनुष्यनिर्मित कृत्रिम जीवनसत्त्वे नको असतात. ती शरीराला हानिकारक असावीत, निदान पथ्यकर तरी नसावीत. शिवाय नैसर्गिक तेलात शेकड्यांनी नैसर्गिक घटक असतात; ती नष्ट करून आपण फक्त दोन चारच टाकतो आणि जाहिरात मात्र बेफाट करतो.

अशी अनेक उदाहरणे आहेत की आजोबा, पणजोबा तेल, तूप सर्व प्रकारचे खाऊनही ९० वर्षांच्या वर जगले आणि healthy diet करणारे अनेकानेक सत्तरीच्याही आधी या पृथ्वीतलावरून गाशा गुंडाळताना आपण पाहतो.

## साधू आणि गवळण

एका गावात एक साधू राहत होता लोक त्याचा फार आदर करत असत. त्या गावात दुसऱ्या गावातून दुध विकण्यासाठी एक गरीब गवळण येत असे. सर्वात प्रथम ती साधूला दुध आणून देत असे. त्यानंतर ती गावातील इतर लोकांकडे दुध वाटत असे. एके दिवशी तिला येण्यास उशीर झाला. साधूने तिला कारण विचारले तेव्हा तिने उत्तर दिले, ''आज नदी पार करायला नाव उशिरा मिळाली, त्यामुळे येण्यास उशीर झाला.'' साधू हसत म्हणाला, ''लोक तर ईश्वराच्या नावावर संसारसागर पार करतात आणि तुला नदी पार करायला नाव लागते. असे वाटते कि तुला ईश्वरावर विश्वास नाही.'' त्या भोळ्या गवळणीवर या बोलण्याचा खूपच परिणाम झाला.

दुसऱ्या दिवशी पहाटेच ती गवळण साधूच्या आश्रमाच्या दारात साधूला हाक मारू लागली. साधू त्यावेळी अजून झोपलेले होते. तिच्या हाकेने साधू जागा झाला. दार उघडताच तिला पाहून साधू हैराण झाला. त्याने विचारले, ''रोजच्या वेळेपेक्षा आज तुम्ही लवकर कशा काय आलात?'' गवळण म्हणाली, ''महाराज तुमच्या उपदेशाने माझे काम झाले, नावेची समस्या कायमची संपली. रोजचे भाडे वाचले, आपल्या सांगण्यानुसार ईश्वराचे नाव घेतले आणि नदी पार करून आले''

साधूचा या गोष्टीवर विश्वास बसला नाही. जेव्हा ती नदीच्या रस्त्याला जाऊ लागली, तेव्हा साधूही तिच्यापाठोपाठ नदीत गेला. जेंव्हा पाण्याची पातळी वाढली तेव्हा साधू घाबरून पाण्यात पडला आणि वाचविण्यासाठी आवाज देवू लागला, तेव्हा गवळणीने त्यांना पाण्यातून बाहेर काढले आणि विचारले, ''तुम्ही आपलाच उपदेश अंमलात आणून जर ईश्वराकडे प्रार्थना केली असती तर तुम्ही नदी पार करू शकला असता.'' गवळणीचा ईश्वरावरील गाढ विश्वास पाहून साधू शरमिंदा झाला.

**तात्पर्य** – दृढ निश्चयाने सर्व काही सध्या होते.

## जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



### जीवन की रोशनी

इस स्वर्ग संसार में सबसे नीचे का स्थान अपने मित्र और दोस्तों के साथ निष्काम प्यार करने वाले, अपने से अच्छे पुरुषों के लिए प्रशंसा भाव रखने वाले मनुष्यों के लिए है। इनके फल की मात्रा सीमित और छिछली, बर्तन छोटा परन्तु खुशी शुद्धता और मिलकर चलने की भावना से ओत प्रोत होती है। इनको कुछ समय यहीं रखकर इनकी शक्तियों और समर्थता को बढ़ाकर दोबारा धरती पर जन्म दिया जाता है। इससे आगे वे धार्मिक पुरुष और स्त्रियाँ आती हैं जिनके दिल और दिमाग परमात्मा की ओर मुड़े हुए होते हैं। वह परमात्मा जो उनका निजी परमात्मा होता है और जिसका कोई भी नाम या रूप हो सकता है जिनमें इनका विश्वास हो। निराकार और अनाम उनके इष्ट के रूप में ही प्रकट होकर उनकी भावुक और मानसिक समर्था अनुसार उनको भक्ति के आनंद से भर देता है। ईश्वरीय शक्ति अपने भक्त को जाने पहचाने रूप में ढाँप लेती है। आश्चर्य की बात यह है कि इन्सान भूल जाता कि सारे देवता उसके अपने अन्तर निवास करते हैं। हमें निराकार अपने इष्ट को देखने के लिए केवल अपने अन्तर की ओर मुड़ना है। इसी लिए कहा गया है–

खुद निराकार होते हुए भी सारे आकार उसके हैं। अनाम होते हुए भी सारे नाम उसके हैं। उसे जिस भी किसी नाम से पुकारो, तुम्हारी ओर लौट आता है। तीसरे लोक में वे लोग आते हैं जो इन्सान में परमात्मा देखते हैं और मनुष्य जाति और प्रभु की सृष्टि की सेवा करते हैं। इस स्थान पर उन्हें भविष्य के महान् जनहित महापुरुषों के रूप में पूर्ण किया जाता है और मनुष्य जाति से निस्वार्थ प्यार की समर्थ शक्ति का स्वामी बनाया जाता है। संगीत, मूर्तिकला, चित्रकला आदि जैसी कलाओं में कुशल निर्माता, प्रकृति के नियमों को ढूँढने वाले वैज्ञानिक और खोजी और ज्ञान की गहराइयों में विचरने वाले उत्सुक और श्रद्धालु विद्यार्थियों को चौथे उपलोक में जगह मिलती है ताकि वे आने वाले युगों के पूर्ण शिक्षक बनने के लिए अपने आपका विकास कर सकें। जब वे मनुष्य जाति धरती पर आते हैं तो मनुष्य जाति का नेतृत्व करने के लिए मसालची का काम करते हैं और समय की रेत पर अपने पद चिह्न छोड़ जाते हैं। इससे आगे निराकार स्वर्गों के तीन लोक आते हैं। अधिकतर आत्माएँ केवल नीचे के लोकों तक पहुँचती हैं, थोड़ा समय वहाँ रहती हैं, अपने बोये कर्मों के अनुसार अन्तर एक झलक सी पाकर अदृश्य अगोचर एक डुबकी सी मारकर वापिस मृत्यु लोक में लौट आती है मगर दूरदर्शी और पवित्र जीवन वाली आत्माएँ एक दम सचाई का साक्षात्कार कर लेती हैं और बाहरी आँखों से बड़ी भिन्न–भिन्न नज़र आती वस्तुओं में भी एक ताल में काम कर रहे स्थिर दैवी नियम के बारे में सीख लेती हैं। और अधिक उन्नत आत्माएँ जिनकी स्मरण शक्ति पूर्ण और अटूट होती है, छठे उपलोक में जा पहुँचती हैं और दैवीमन (ब्रह्म) की सम्पत्तियों के भण्डार एकत्र करके परमात्मा के मनुष्य के प्रति उपकारों को सिद्ध करने और उसकी शान का व्याख्यान करने के लिए मानवता के पथ–प्रदर्शक के तौर पर धरती पर वापिस आती हैं। बीते युगों के महापुरुष और महान शहीद यहाँ ब्रह्म के हुक्म को पूर्ण रूप में और एक अटूट लड़ी (जंजीर) क रूप में काम करते देखते हुए शानदार जीवन का आनन्द प्राप्त करते हैं।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग – २)

### अंतरीक बल

अपने संसार को बदलने के लिये आप को बस इतना ही करना है कि अपने अन्दर के अहसास को बदल लें। इस से आप का समय बचेगा। दूसरों को बेहतर बनाना चाहते हैं तो उन्हें धमकाना छोड़ दें, उन्हे स्नेह दें तथा खुद को और भी श्रेष्ठ बनाते चलें। आप का बहुत समय बचेगा। यही तो स्वंय प्रबन्धन है।

समय को नष्ट न करें – में बदल दें। नेपोलियन केवल चार घंटे ही सोता था। एडिसन तो सिर्फ तीन घंटे ही सोता था। खोया हुआ धन मेहनसे दुबारा प्राप्त किया जा सकता है। स्वास्थ्य दुबारा पाया जा सकता है। नष्ट हुआ समय दुबारा नहीं पा लिये नष्ट हो जाता है। आम लोग १०–१५ मिनटाइम मेनेजमेंट समय नष्ट न करें सकते वह सदा का कोई मूल्य नहीं समझते।

जितनी देर में चाय का पानी एक केतली में उबलता है, उतनी देर का प्रयोग करते हुए, एक व्यक्ति ने एक महान ग्रंथ का अनुवाद कर डाला। महान लोग अपना एक मिनट भी व्यर्थ नहीं जाने देते। महान बनने वाले लोग सदा अपनी जेब में पढ़ने योग्य एक बुक रखते हैं। जैसे ही उन्हें समय मिलता है, वह उसे पढ़ते हैं। ईश्वर एक बार में एक ही क्षण देता है। दूसरा क्षण देने से पहले, पहले वाला क्षण ले लेता है। जो व्यक्ति सदा कार्य में व्यस्त रहता है, उसके बारे कोई भी चिंतित नहीं रहता है। जो व्यस्त रहता है वह कुछ न कुछ अवश्य कर के दिखायेगा, यह विश्वास सभी को होता है। ख्याति अर्जित करने वाले व्यक्ति अपना सायंकाल का समय अधिकतर अध्ययन करने में अथवा किसी कार्य विशेष में व्यय किया करते हैं।

एक विज्ञानिक जिन दिनो पुस्तकों पर जिल्द बांधने का कार्य करता था, उन दिनो समय बचता था, उस समय में प्रयोग किया करता था। प्रतिदिन यदि एक घंटा भी कोई नया काम सीखा जाएं, तो कुछ ही दिन में अनभिज्ञ व्यक्ति भी उसमें पारंगत हो जाएगा। यदि प्रति दिन आप एक घंटे में किसी पुस्तक के १० पेज पढ सकें तो वर्ष भर में कई पुस्तकें पढ़ जाएंगे। हर रोज अगर आप एक घंटे का सही उपयोग करें तो आप महान बन जाएंगे। एक घंटे का उपयोग अगर राजयोग में करें तो कोई गुमनाम व्यक्ति भी उपयोगी और महान बन सकता है। खाली समय को किसी अच्छे काम में लगायें और आनंद

जिस समय को अन्य व्यक्ति दिखावे तथा शारीरिक और मानसिक विश्राम में व्यय कर देते हैं, महान व्यक्ति वही समय ज्ञान के चिन्तन और अध्ययन में लगाते हैं। एक पादरी रात्रि में जाग कर उन विचारों को लिपिबध किया करते थे, जो दिन में काम करते समय उनके मस्तिष्क में आया करते थे। महान व्यक्ति अपने खाली समय को स्वर्ण से भी अधिक मूल्यवान समझते हैं। वे एक क्षण को व्यर्थ नहीं जाने देते। एक डॉक्टर ने दो भाषाएं घोड़े की पीठ पर यात्रा करते हुए सीखी। एक व्यक्ति को जरा सा भी कोई नया विचार आता तो उसे जो भी कागज का टुकड़ा मिलता उसी पर लिख देता। कई लोगों ने नई भाषाएं आफिस आने जाने के समय में सीखी। एक व्यक्ति कहीं यात्रा पर गया। जहाज डूब गया। जब जहाज डूब रहा था तो वह अपनी पुस्तक पढ़ने में लीन था।

एक व्यक्ति अपना प्रत्येक मिनिट का उपयोग अपना सुधार और उन्नति के लिये लगाया करते थे। वे इतना काम करते रहते थे कि नींद करना भी भूल जाते थे। वह कभी कभी तो अपना कार्य समाप्त करने के लिये दो दिन और दो रात लगातार लिखते रहे। उसने एक ग्रंथ तो मृत्यु शय्या पर पड़े पड़े ही लिखा था।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### गर्भावस्थेतील पहिले तीन महिने–आहार

उदा. : रात्रीच्या जेवणानंतर जवळजवळ सात–आठ तास पोट रिकामे असते: सहाजिकच जठरामध्ये पित्त साचते व सकाळी उठल्यावर नेहमीच्या सवयीने चहा प्यायला जातो. रात्रभर साचलेले पित्त व त्यावर परत चहा यामुळे पित्त अजूनच वाढते व लगेच हमखास उलटी होते. याकरिता सकाळी पातळ पदार्थ घेणे टाळावे. रात्री झोपतानाच दात घासून झोपावे व सकाळी झोपेतून उठल्या उठल्या जाडसर गोड पदार्थ खावा.

उदा. टोस्ट, शिरा, चार–पाच खजूर, सात–आठ काळे मनुके, दोन–तीन बदाम, नाचणीचा लाडू, एखादीला गोड पदार्थ आवडत नसल्यास तूप लावून पोळी खावी किंवा कमी तिखट भाजी व पोळी खावी. पाणी एकदम पिऊ नये. थोडे थोडे पाणी सारखे पित राहावे. पातळ पदार्थही थोडे थोडे सारखे घ्यावेत.

उदा. दूध, चहा सकाळी ९ वाजल्यानंतर घ्यावा. घट्ट पदार्थांमुळे रात्रभर साचलेले पित्त तो या पचवायच्या कामी लागते; त्यामुळे उलटी होत नाही. पहिल्या तीन महिन्यांमध्ये गर्भवतीने रोज एक फॉलिक ॲसिडची गोळी घ्यावी तसेच याकरिता नाचणीच्या सत्त्वाची जाडसर लापशी सकाळी उठल्या बरोबर खावी किंवा नाचणीच्या सत्त्वाची दुधाबरोबर खीर खावी किंवा नाचणीचा लाडू खावा. यामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शियम व लोह असते. जर फॉलिक ॲसिडची कमतरता झाली तर बाळाच्या स्पाइनल कॉर्डमध्ये दोष निर्माण होण्याची शक्यता असते. त्याकरिता ही काळजी घेण्यास हवी. आयुर्वेदामध्ये आईच्या चौरस आहाराला प्राधान्य दिले आहे. आईचा आहार आयुर्वेदानुसार सात्त्विक असावा. सत्त्व, रज व तम या तीन गुणांपैकी सत्त्व हा गुण उत्तम आहे; म्हणून शक्यतो शाकाहारी आहाराला प्राधान्य द्यावे. मोड आलेली कडधान्ये यामधून प्रथिने व ओमेगा–३ अशी फॅटी ॲसिड्स मिळतात. जवसातून सुद्धा ओमेगा–३ मिळते. मुगडाळ तसेच सर्व काही डाळींमधून प्रथिने मिळतात. आहारामध्ये यांचा समावेश असावा. हिरव्या पालेभाज्यांमध्ये लोह असते. हिरव्या पालेभाज्या, दूध, शेंगदाणे, गूळ, राजगिरा, काळे मनुके, खजूर, बीट, गाजर हे पदार्थही गर्भवतीच्या आहारात असावे. म्हणजे आयुर्वेद व आधुनिकशास्त्रांची सांगड घालून चौरस आहार तयार होतो. एकाच वेळी भरपूर खाण्यापेक्षा दर दोन तीन तासांनी थोडे थोडे काहीतरी खात राहावे. म्हणजे उलटी व मळमळ होणार नाही. गर्भवतीची व बाळाची तब्येत सुदृढ होईल.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ–महांडूळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४०००००

# क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे



आज १४ नोव्हेंबर, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांची जयंती.

भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे (राऊत) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रागाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले.

५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात.

आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# बालदिन



आज १४ नोव्हेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात बालदिन म्हणून साजरा केला जातो. वास्तविक जागतिक पातळीवर २० नोव्हेंबरला बालदिन साजरा केला जातो. १९५४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने ठरवल्यानुसार, पाहिल्यांदाच बालदिन साजरा करण्यात आला. सर्व देशांनी लहान मुलामुलींमध्ये सांप्रदायिक आदान-प्रदान व विविध संप्रदाय वा धर्माबाबतचे सामंजस्य वाढवणे तसेच जगभरातील मुलामुलींचे आयुष्य अधिक चांगले बनवण्याची संकल्पना मान्य करून त्यादृष्टीने काम करावे हा त्या मागचा हेतू. २० नोव्हेंबर हीच तारीख निवडण्याचे कारण असे की १९५९ मध्ये याच तारखेस संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने बाल हक्कांची सनद स्वीकारली. शिवाय १९८९ मध्ये याच दिवशी बाल हक्कांच्या मसुद्यावर सह्या झाल्या. हे हक्क आतापर्यंत १९१ देशांनी मान्य केले. भारतात मात्र १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो. कारण भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा हा जन्मदिवस. १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म झाला. पंडित नेहरूंना लहान मुले खूप आवडायची. ते सतत लहान मुलांच्या गराड्यात असायचे. लहानमुले हेच देशाचे भविष्य आहे. आजचा बालक उद्याचा नागरिक आहे. तो नेहमी आनंदी, उत्साही आणि सुरक्षित असायला हवा. देशातील लहान मुले सुरक्षित तर देश सुरक्षित असे ते नेहमी म्हणत. मुलामुलींना सुरक्षित आणि प्रेमाच्या वातावरणात वाढवले गेले पाहिजे तसेच त्यांना आपले आयुष्य फुलवण्याच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासात भर घालण्याच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. पंडित नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान होते. पंडित नेहरूंना बालकांविषयी वाटणाऱ्या प्रेमाची आठवण म्हणून हा दिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो शिवाय पंडित जवाहरलाल नेहरूंना मुलांविषयी वाटणाऱ्या प्रेम व जिव्हाळ्याविषयी आदर व्यक्त करण्याचा देखील हा एक मार्ग आहे. बालकांनाही आनंद घेण्याचा, मौजमस्ती करण्याचा हक्क आहे. आजचे बालक हाच देशाचे भविष्य आहे. या बालकांमधूनच देशाचे भावी सुशिक्षित तसेच मनाने आणि शरीराने आरोग्यसंपन्न असे नागरिक तयार होणार आहेत. हा हक्क मिळालेल्या नशीबवान बालकांनी आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याची जाणीव ठेवली पाहिजे. पालकांनी ही जाणीव आपल्या मुलांमध्ये रुजवली तर भावी नागरिक सुज्ञ आणि समजूतदार बनतील त्यामुळे देशाचे भविष्य उज्ज्वल होईल. बालदिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने मुलांच्या कल्याणासाठी काहीतरी करण्याचा संकल्प केला पाहिजे. देशातील सर्व मुलामुलींना बालदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

# रोटरी क्लब ऑफ अहमदनगरला पीसबिल्डर क्लबचा बहुमान

नगर – येथील रोटरी क्लब ऑफ अहमदनगरला पीस कमिटीच्या चेअरमन डॉ. सुधा कांकरिया यांच्या नेतृत्वाखाली पीसबिल्डर क्लब म्हणून बहुमान प्राप्त झाला आहे. आणि असा बहुमान प्राप्त होणारा रोटरी प्रांत ३१३२ मधील पहिला व एकमेव क्लब आहे अशी माहिती अध्यक्ष नितीन थाडे यांनी दिली. रोटरी प्रांत ३१३२ मध्ये सुमारे १०० रोटरी क्लब असुन त्यात फक्त रोटरी क्लब ऑफ अहमदनगरला पीसबिल्डर क्लबचा बहुमान प्राप्त झाला आहे. विविध सामाजिक कार्यामध्ये क्लबने आपला ठसा उमटविला आहे. कोविड महामारीमुळे जिथे सर्व जग चिंताग्रस्त, भयभित झाले होते. तिथे डॉ. सुधा कांकरिया यांच्या नेतृत्वाखाली सुमारे ९००० कोरोनापिडीत रूग्णांना हिलिंग व मेडिटेशनची ऑनलाईन मोफत सेवा देण्यात आली, अशी माहिती उपप्रांतपाल पुरूषोत्तम जाधव यांनी दिली.



रोटरी क्लब ऑफ अहमदनगरला पीसबिल्डर क्लबचा मिळालेला बहुमान. समवेत शांतता समितीच्या चेअरमन डॉ. सुधा कांकरिया, अध्यक्ष नितीन थाडे आदी पदाधिकारी व सदस्य.

२०२३-२४ ला माधवराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली रोटरी पीस सेंटरची स्थापना करण्यात आली. ते देशातील पहिले रोटरी पीस सेंटर ठरले. त्याद्वारे अनेक शाळा, कॉलेज, स्वयंसेवी संस्था तसेच कारागृहातूनही मन:शांतीसाठी व तणावमुक्त जीवनासाठी राजयोगा जीवनपध्दतीचे कोर्सेस घेण्यात आले. अनेक तरूण-तरूणीना आत्महत्येच्या मानसिक प्रदुषणापासुन दूर केले. २०२४-२५ चे अध्यक्ष नितीन थाडे यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक आठवडयातील दोन दिवस शांतता प्रस्थापित करणाऱ्या कार्यासाठी देण्यात येत आहे.

## रोटरी प्रांत ३१३२ मधील पहिला व एकमेव क्लब

शांततेसाठी कार्यशाळा, सह्यांची मोहिम, शांती पदयात्रा, सामुहिक मेडिटेशन, शांततेची सुरूवात माझ्या पासुन या विषयावर विविध स्पर्धा, नाटिका सादरीकरण, सामुहिक शपथ, शालेय विद्यार्थ्यांसाठी IQ : EQ : SQ वृध्दींगत होण्यासाठी दैनंदिन मेडिटेशनचा अभ्यास, असे अनेकविध उपक्रम राबवुन ५० हजार पेक्षा जास्त व्यक्तींना यात सामावुन घेण्यात आले. रोटरी शांतता समितीच्या चेअरमन डॉ. सुधा कांकरिया यांना २०२३ च्या आंतरराष्ट्रीय शांतता परिषदेचे सन्मानपुर्वक निमंत्रण आले. तेथे त्यांनी 'रोटरीचे सेवाकार्य आणि शांतता' या विषयावर आपले मौलिक विचार मांडले. सदर आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये डॉ. सुधाताई कांकरियांचा शांतता सन्मान देऊन गौरव करण्यात आला अशी माहिती क्लबचे सचिव सुभाष गर्जे यांनी दिली.

आपले मनोगत व्यक्त करतांना डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या कि क्लबच्या प्रत्येक सदस्यांनी आपापली जबाबदारी चोखपणे पार पाडली आहे. आंतरराष्ट्रीय रोटरी संस्थेचे पहिले ध्येय जागतिक शांतता हे आहे. आंतरराष्ट्रीय रोटरीचे पदाधिकारी संयुक्त राष्ट्र (UN Assambely) असेंब्लीचे सन्मानीय सदस्य आहेत. जगभरातील २०० देशामध्ये ३४००० पेक्षा जास्त रोटरी क्लबस् असुन १२ लाख पेक्षा जास्त त्यांचे सभासद आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या रोटेरीयन ॲक्शन ग्रुप फॉर पीस यामध्ये आता रोटरी क्लब ऑफ अहमदनगरचा समावेश झाला असून क्लबला पीसबिल्डर क्लब म्हणून बहुमान प्राप्त झाला आहे. प्रांत ३१३२ चे प्रांतपाल डॉ. सुरेश साबु, माजी प्रांतपाल प्रमोद पारीख, शिरीष रायते, उपप्रांतपाल प्रसन्ना खाजगीवाले सहित अनेकांनी अभिनंदन केले आहे. क्लबच्यावतीने शांतता समितीची स्थापना करण्यात आली. शांतता समितीच्या चेअरमन डॉ. सुधा कांकरिया, अध्यक्ष नितीन थाडे, सचिव सुभाष गर्जे, कमिटी मेंबर डॉ. प्रकाश कांकरिया, निलेश वैकर, पुरूषोत्तम जाधव, अनघा राऊत, माधवराव देशमुख, जवाहर मुथ्था, दादासाहेब करंजुले, आशिष ताथेड यांची नियुक्ती करण्यात आली, अशी माहिती सहसचिव साधना देशमुख यांनी दिली.

# कष्टकरी शेतकरी तरूणांच्या पाठीशी राहणाऱ्यांनाच मतदान

## स्मायलिंग अस्मिताच्या उत्तर महाराष्ट्र विभागाच्या बैठकीत निर्णय

नगर – २० नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक असून ही निवडणूक शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी व उच्च शिक्षित तरूणांसाठी खूप महत्त्वाची असून फक्त आघाडी व युती न पाहता आतापर्यंत ज्या लोकप्रतिनिधींनी विद्यार्थी व तरूणांच्या चळवळीसाठी योगदान दिले आहे, अशाच उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून आणण्यासाठी प्रचंड मेहनत घेत संघटनेचे सदस्य तसेच संबंधित शहरी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी व तरूणांनी कंबर कसून रेकॉर्ड ब्रेक मतदान घडवून आणत कष्टकरी शेतकरी चळवळीचा आवाज बुलंद करावा, असे आवाहन स्मायलिंग अस्मिताचे कार्याध्यक्ष यशवंत तोडमल यांनी यावेळी केले आहे. लार्ज मिटींग या पर्यायाव्दारे झूम मिटींगच्या माध्यमातून अहिल्यानगर, नाशिक, धुळे, जळगाव जिल्ह्यातील २०० पेक्षा अधिक पदाधिकारी यात सहभागी झाले होते.



यशवंत तोडमल

दरम्यान आर्किटेक्ट दुर्गा वाघ म्हणाल्या की, आपल्याला सुध्दा आपल्या संघटनेची छाप उमटविण्याची हीच खरी संधी आहे. वृध्दांसाठी संघटनेच्या वतीने ३० रिक्षांची सोय घरापासून मतदान केंद्रावर जाण्यासाठी करण्यात येईल. सोबतच जास्तीत जास्त उच्च शिक्षित तरूणांचे मतदान घडवून आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा आम्ही करत आहोत. पुण्यात काम करणाऱ्या मित्रांना व त्यांच्या सहकाऱ्यांना जागोजागी मतदानासाठी आम्ही विविध आय कंपन्यांसोबत चर्चा सुरू केली आहे जेणेकरून त्यांना मतदान करता येईल.

नगर शहरात सुध्दा महिला व वृद्धांसाठी मतदान केंद्रावर जाण्यासाठी आम्ही जबाबदारी स्वीकारून रिक्षा उपलब्ध करून देत सकाळी आठ ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत आम्ही मेहनत घेणार आहोत, नगर शहर, राहुरी,पाथर्डी, पारनेर संगमनेर नेवासा तालुक्यातील तरूणांचा यात मोठ्या संख्येने सामावेश आहे.महाराष्ट्र घडवायच्या या प्रक्रियेत आपला वाटा उचलणे हे आपले कर्तव्य आहे अशी माहिती स्मायलिंग अस्मिताचे कार्यवाह धिरज कुमटकर यांनी दिली.

# यंदाचा बालदिन ठरणार वचन दिन

## जिल्ह्यातील लाखो विद्यार्थी आई-वडिलांकडून घेणार मतदानाचे वचन

नगर – महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांनी १०० % मतदानाची भूमिका बजवावी त्याचबरोबर मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी व मतदारांमध्ये जनजागृती होण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या निर्देशानुसार जिल्हाभरातील शाळा / महाविद्यालयांमध्ये १४ नोव्हेंबर बालदिनी वचन दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.




या वचनदिनी विद्यार्थी आई-वडिलांकडून पुढील वचन घेणार आहेत. प्रिय आई बाबा,मला माहित आहे की आपल्या अहिल्यानगर जिल्ह्यात २० नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या निवडणुकीचा व माझ्या भविष्याचा महत्त्वाचा संबंध आहे. तुम्ही दोघांनी कुणाकडून काहीही न घेता निर्भयपणे मतदान केल्याने माझे भविष्य देखील निर्भय होणार आहे. त्यामुळे तुम्ही मला वचन द्या की तुम्ही जगातील सर्वात चांगले आई-बाबा म्हणून मला जे प्रेम दिले तेच प्रेम निरपेक्ष मतदानातून तुम्हीआपल्या महाराष्ट्राला देणार. तुमच्याच पावलावर पाऊल ठेवून मी देखील लोकशाहीचा पाईक होणार

वरील वचन शाळा /महाविद्यालयांतून विद्यार्थ्यांकडून शिक्षकांमार्फत लाऊड स्पीकरवर प्रतिज्ञेसारखे म्हणून व लिहून घेतले जाणार आहे. घरी गेल्यावर हे वचनपत्र विद्यार्थी आपल्या आई-वडिलांना देणार आहेत. उपक्रमासाठी अशोक कडूस (स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी- माध्य) व भास्कर पाटील (अध्यक्ष मतदार जागृती मंच-मतदारनगरी तथा शिक्षणाधिकारी- प्राथ)यांचे मार्गदर्शन लाभले आहे.उपक्रमाचे फोटो/ व्हिडिओ /वृत्तांत करून सोशल मीडियावर शेअर करायचा आहे.

उपक्रमासाठी राहुल पाटील (उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी), बाळासाहेब बुगे(शिक्षणाधिकारी-योजना),आकाश दरेकर (उपशिक्षणाधिकारी), मीना शिवगुंडे (उपशिक्षणाधिकारी), जयश्री कार्ले (विस्तार अधिकारी), डॉ. अमोल बागुल (जिल्हा मतदारदूत) व सर्व स्वीप समिती सदस्य आदींनी सहकार्य केले आहे.







स्व. सुरेखा लुणिया यांच्या स्मृतीदिनानिमित्त संगीतमय श्रद्धांजली कार्यक्रमप्रसंगी महिला, ज्येष्ठ पत्रकार सुभाष गुंदेचा, जे.डी.खानदेशे, के.डी. खानदेशे, सुहास मुळे, ॲड. विजय लुणे, ज्येष्ठ नागरिक, महिला आदी.

# स्वर्गीय सुरेखा लुणे सहाव्या स्मृतिदिनानिमित्त संगीतमय श्रद्धांजली कार्यक्रम

नगर – स्व. सुरेखा विजय लुणे (मयुरी भाभी) यांच्या सहाव्या स्मृती दिनानिमित्त सुहासभाई मुळे प्रस्तुत स्वरांजली या मधुर हिंदी व मराठी गितांचा / संगीताचा कार्यक्रम ९ नोव्हेंबर रोजी आगरकर मळा येथे पार पाडला.

या सदर कार्यक्रमाची सुरूवात मयुरी भाभीचे कुटुंबिय व त्यांच्या आगरकर मळ्यातील मैत्रीणींच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन झाले. दीप प्रज्वलन मयुरी मॉलच्या संचालिका मयुरी लुणे - गुप्ता, मयुरी भाभीची आई सुशिलाबाई गांधी, बहिण ज्योत्स्ना मुनोत व मयुरी भाभीच्या मैत्रीणी खताळ वहिनी, सौ. जमधाडे, सौ.दळवी, सौ. रेखा विधाते, सौ. सुनिता आगरकर, कुलथे वहिनी व सरोज गुप्ता यांनी केले.

या संगीत मैफिलीमध्ये रामदास गव्हाणे, संतोष पानसरे किरण खोडे, आराधना गायकवाड, सागर शेळके, सुनील हळगावकर, राजेंद्र शहाणे आणि विजय जाधव अशा कलाकारांनी त्यांचे समयोचित उत्कृष्ट गायन सादर केले.

प्रास्तावित ॲड. विजय लुणे यांनी केले. त्यावेळी त्यांनी मयुरी मॉलचा कस्टमरला होलसेल पेक्षाही कमी दरात माल देण्याचा प्रयत्न असतो असे सांगितले. यावेळी सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात असलेल्या योगदानाचा विचार करुन मयुरी मॉलतर्फे ॲड. विजय लुणे, सुभाष लुणे, मयुरी लुणे - गुप्ता यांनी मराठा विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त जी.डी. खानदेशे, दैनिक नवा मराठाचे संपादक सुभाष गुंदेचा, ज्येष्ठ नागरीक संघाचे अध्यक्ष के. डी. खानदेशे यांचा शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी स्टेशन परिसर, आगरकर मळा परिसरातील बहुसंख्य नागरीक व ॲड. लुणे यांचे स्नेही उपस्थित होते. त्यांचे ॲड. विजय लुणे यांनी आभार मानले.

मयुरी भाभी या नावाने स्व. सुरेखा लुणे परिचित होत्या. त्यांचे सर्वत्र प्रेमाचे व जिव्हाळयाचे संबंध असल्यामुळे खुपच गर्दी झाली होती. यावेळी उपस्थितीत मुयरी भाभींच्या मैत्रीणींनी मयुरीपण आई सारखीच असल्याने तीने सर्व संबंध टिकून ठेवले व आम्हां सर्वांना प्रेमाने बांधुन ठेवले असे सांगितले.

यावेळी बोलताना सुभाष गुंदेचा यांनी लुणे परिवार व मयुरी मॉल नेहमी कुठल्यान कुठल्या कारणाने समाजाला आनंद, प्रोत्साहन देणारे उपक्रम साजरे करतात त्याबद्दल आनंद व्यक्त केला. ते पुढे म्हणाले की, मी अनेक ठिकाणी पदाधिकारी किंवा कार्यरत असलो तरी नवा मराठा हे माझे ओळखपत्र आहे. कारण तो सर्वसामान्य जनतेचा निर्भीड आवाज आहे आणि अशा निर्भीड वृत्तपत्रांमध्ये सुहासभाई मुळे सारखे निर्भीड विचारवंत आणि लढवय्ये आहेत याचा मला अभिमान आहे. त्यांनी इतके वर्ष माझ्यापासून लपवून ठेवलेला आणि आज पाहिलेला हा संगीतातला गुण मात्र आज मला खूप खूप अभिमानास्पद वाटला.

ज्येष्ठ नागरिक संघाचे के.डी. खानदेशे म्हणाले की सुहासभाई सारखे कोहिनूर हिरे आपल्यामध्ये आहेत. त्यामुळे आपण स्वतःला नवा मराठा प्रमाणे निर्भीड राहून यामधे झोकून द्यायला अजिबात मागे पुढे पाहायला नाही पाहिजे. दैनिक नवा मराठा सारखे निर्भीड निष्पक्ष कोणाचीही भाटगिरी न करणारे माध्यम ही लोकशाहीची बिघडत चाललेली व्यवस्था निश्चितच रुळावर आणेल असा विश्वास वाटतो.

सुहास मुळे यांचा स्वरांजली कार्यक्रम सर्वांनाच खुप आवडला. यावेळी बोलताना के. डी. खानदेशे व ॲड. लुणे यांनीही सुहास मुळे यांनी खुप सुंदर कार्यक्रम केल्याबद्दल त्यांचे आभार मानले व सत्कार केला.

यावेळी उपस्थित सर्वांनाच मुयरी भाभींची आठवण येत होती. या कार्यक्रमास महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप, आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर, शिवसेना (ठाकरे गटाचे) विक्रम राठोड, दत्ता जाधव तसेच सहकार महर्षी सुवालाल गुंदेचा नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन संतोष गांधी यांनी सदर कार्यक्रमास भेट देऊन मयुरी भाभींचे कार्याचे कौतुक करुन कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

हा कार्यक्रम मयुरी लेडीज मॉल, आगरकर मळा, अहमदनगर, ज्येष्ठ नागरीक संघ स्टेशन परिसर व जागरुक नागरीक मंच यांनी सामुहिकरित्या आयोजित केला होता.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी मयुरी मॉल स्टाफ, ज्येष्ठ नागरीक संघाचे दत्तात्रय फुलसौंदर, विकास मुळे, अशोक आगरकर, मधुकर उगले, सलीम शेख, गोरख गाडळकर, ॲड. दत्तात्रय लोखंडे, कविटकर, हिरालाल शर्मा, लांडगे सर, अनिल मुथा, नुर आलम, शिवाजीराव ससे यांनी खुप परिश्रम घेतले.

यावेळी ॲड. मेहेर, ॲड. सुद्रिक, ॲड. बंग, ॲड. भापकर व कुटुंबिय तसेच परिसरातील नागरीक उपस्थित होते.

# मौलाना आझाद यांनी शिक्षणाला राष्ट्रीय प्रवाहाचे साधन म्हणून अंमलात आणले

### प्रा.डॉ.महेबुब सय्यद यांचे प्रतिपादन



मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या १३७ व्या जयंतीनिमित्त मखदुम सोसायटीच्यावतीने कौमी एकता सप्ताहामध्ये मुकूंदनगर येथील मौलाना आझाद उर्दू मुलींचे हायस्कूलमध्ये व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफताना डॉ.महेबूब सय्यद. समवेत संस्थेचे पदाधिकारी.

नगर – भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना आझाद यांनी देशाची शैक्षणिक प्रगती व तरुणांना प्रशिक्षणाच्या गरजा लक्षात घेऊन त्यांनी शैक्षणिक धोरण आखले. शिक्षणाला राष्ट्रीय प्रवाहाचे साधन म्हणून त्यांनी अंमलात आणले. व त्यामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी क्रांती होऊन शिक्षणाचे दारे सर्वांसाठी खुली झाली. त्यामुळे शिक्षण विस्ताराचे जनक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते, शिक्षणाचे महत्व विशद करतांना संसदेत मौलाना आझाद म्हणाले होते की, देशाचे अंदाजपत्रकात शिक्षणाला महत्वाचे स्थान देणे गरजेचे आहे. अन्न, वस्त्रानंतर शिक्षणाचा क्रम लावला पाहिजे. त्यांचे असे मत होते की, देशाच्या पंचवार्षिक योजनेचा हेतू केवळ शेती, उद्योग, वीज, दळणवळणाची साधने यांची प्रगती एवढाच असू नये तर देशाच्या नवीन पिढीची जडण घडण योग्य प्रकारे होण्यासाठी शिक्षणाकडेही तेवढेच लक्ष दिले पाहिजे. म्हणूनच सुरुवातीच्या काळात देशाचे शैक्षणिक बजेट दोन कोटीचे होते. ते १९५८ साली ३० कोटींचे झाले. शैक्षणिक विकासासाठी त्यांनी ठोस पाऊले उचलली. अनेक नविन शैक्षणिक संस्था निर्माण करुन विकसित केल्या, असे प्रा.डॉ. महेबूब सय्यद म्हणाले.

१९२३ साली अवघ्या ३५ व्या वर्षी ते काँग्रेस पक्षाचे सर्वात तरुण अध्यक्ष बनले. धारासना सत्याग्रहाचे ते प्रमुख क्रांतीकारक होते. पुढे १९४०–४५ या काळात सलग सहा वर्षे ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष राहिले. त्यांच्याच काळात १९४२ चे अंग्रेजो भारत छोडो ही चळवळ उभी राहिली. स्वातंत्र्यासाठी एकूण साडे सात वर्षे त्यांनी कारावास भोगला. स्वातंत्र्य लढ्यात सर्वाधिक काळ कारावास भोगण्याचा उच्चांक त्यांच्या नावावर आहे. त्यांच्या आयुष्यातील सरासरी आठवड्यातील एक दिवस कारावासात गेला आहे, असे नमूद केले.

### व्याख्यानमाला पहिले पुष्प

मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या १३७ व्या जयंतीनिमित्त मखदुम सोसायटीच्यावतीने आयोजित कौमी एकता सप्ताह मध्ये मुकुंदनगर येथील मौलाना आझाद उर्दु मुलींचे हायस्कुल मध्ये डॉ.महेबुब सय्यद यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी मोहम्मदीया एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक व प्रमुख कार्यवाह प्रा. डॉ. अब्दुस सलाम सर, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, सचिव डॉ. कमर सुरुर, संचालक राजुभाई शेख, डॉ. शमा फारुकी, प्राचार्या फरहाना सय्यद, हसीब शेख, फरीदा जहागिरदार आदी उपस्थित होते. प्रास्तविक डॉ. कमर सुरुर यांनी तर सूत्रसंचालन अंजुम खान यांनी केले. आभार यास्मिन शेख यांनी मानले.

## 'माझी शाळा, बालविवाह मुक्त शाळा' अभियानाचे नगरमध्ये बालदिनानिमित्त १४ नोव्हेंबरला उद्घाटन

### स्नेहालयच्या उडान बालविवाह प्रतिबंधक प्रकल्पाचा पुढाकार



नगर – बालहक्क आणि सुरक्षिततेसाठी पुढाकार घेत, अहिल्यानगरमधील स्नेहालयच्या उडान बालविवाह प्रतिबंधक प्रकल्पाने गुरुवारी (दि.१४ नोव्हेंबर) बालदिनाचे औचित्य साधून माझी शाळा बालविवाह मुक्त शाळा या अभियानाचे उद्घाटन आयोजित केले आहे. जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्या हस्ते होणारे हे उद्घाटन, जिल्ह्यातील सर्व शाळांना बालविवाह मुक्त करण्याच्या दिशेने एक महत्वाकांक्षी उपक्रम ठरणार आहे. या उपक्रमात मराठी पत्रकार परिषद, बालभवन, जिल्हा महिला व बाल विकास विभाग आणि रेडिओ नगर (९०.४ एफ.एम.) यांचे सहकार्य लाभले आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती १४ नोव्हेंबर रोजी बालदिन म्हणून साजरी केली जाणार आहे. बालदिन हा लहान मुलांच्या हक्कांचा जागर, त्यांचे संरक्षण व प्रगती साधण्यासाठी प्रेरणादायी दिवस मानला जातो. चाचा नेहरू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नेहरूंना मुलांवर असलेले विशेष प्रेम आणि त्यांना शिक्षण व समान हक्क मिळवून देण्याचा उद्देश घेऊन उडान प्रकल्पाने प्रत्येक शाळेला बालविवाह मुक्त करण्याचा निर्धार केला आहे.

या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्कांबद्दल जागरूक करून, त्यांच्या उज्वल भविष्याची दिशा ठरवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या विशेष कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि बालविवाह प्रतिबंधाबाबत जनजागृतीचे सत्र असेल. विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्कांचे महत्त्व पटवून दिले जाईल व समाजातील बालविवाहाच्या दुष्परिणामांवर चर्चा केली जाणार असल्याचे उडान प्रकल्पाच्या मानद संचालक ॲड. बागेश्री जरंडीकर यांनी सांगितले.

जिल्ह्यातील बालविवाह समस्येला आळा घालण्यासाठी एक सकारात्मक पाऊल उचलले जाणार आहे. यामुळे मुलांना सुरक्षित आणि स्वतंत्र जीवनाची संधी मिळेल, तसेच त्यांच्या उज्वल भविष्याची हमी मिळण्यासाठी या उपक्रमातून प्रयत्न केले जाणार आहे.

## आनंदऋषीजी डेंटल इन्स्टिट्यूशन येथे १६ नोव्हेंबरला मोफत दंत तपासणी व सवलतीच्या दरात उपचार शिबीर



नगर – जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथील अद्ययावत दंतरोग विभागात मोफत दंतरोग तपासणी व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते २ यावेळेत सदर शिबिर होईल. तज्ज्ञ डॉ. अर्पणा पवार, डॉ. प्राची गांधी, ओरल सर्जन डॉ. स्वराज ठोले रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील.

दातासंबंधीच्या सर्व समस्यांवर अत्याधुनिक उपचार आनंदऋषीजी डेंटल विभागात कमी दरात उपलब्ध आहेत. एकाच छताखाली तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टर तसेच दर्जेदार मल्टीस्पेशालिटी उपचार सुविधा याठिकाणी आहेत. दातांचे आरोग्य प्रत्येकासाठी महत्वाचे असते. शिबिरात इम्प्लांट १३ हजार ५०० रुपये पासून पुढील किंमतीत, रूट कॅनल २ ते ३ हजार रुपयात, सिरॅमिक कॅप बसविणे १५०० ते २ हजार ५०० रुपये, मेटल कॅप १ हजार रुपये, नवीन कवळी बसविणे ८ हजार, १० हजार, १४ हजार रुपये, ३ टाईप डेंस्ट्चर, मशीनव्दारे दात स्वच्छ करणे ५०० रुपयांपुढे, सिमेंट भरणे ५०० रुपयांपुढे अशा अत्यल्प खर्चात करण्यात येणार आहे. शिबिरासाठी नाव नोंदणी आवश्यक असून औषध खर्च वेगळा असेल.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीन द्वारा सेवा उपलब्ध आहे. आनंदऋषीजी ब्लड बँक सेवा २४ तास उपलब्ध आहे. हॉस्पिटलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्ट सह ८०० रुपये, सिटीस्कॅन १२५० रूपये तर एमआरआय २५०० रूपयात उपलब्ध आहे.

अद्ययावत दंतोपचार सुविधांचा रूग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जैन सोशल फेडरेशनच्यावतीने करण्यात आले आहे.

नाव नोंदणी व दातांच्या समस्यांसाठी संपर्क – ९४०४४७२१९९.





आयएमएसच्या जनजागृती उपक्रमात बोलताना मनपाचे उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे. समोर उपस्थित विद्यार्थी.

# लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करा

### उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे यांचे आवाहन; आयएमएसचा जनजागृती उपक्रम

नगर – जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताकडे पाहिले जाते त्यामुळे लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करा असे प्रोत्साहनपर आवाहन अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे यांनी आयएमएसच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

महाराष्ट्रात सध्या विधानसभेच्या निवडणुकीचे वारे वाहात आहेत त्याच अनुषंगाने मतदानाविषयी जनजागृती उपक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे संचालक डॉ. एम बी मेहता, उपसंचालक डॉ.विक्रम बार्नबस, व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. प्रोनोती तेलोरे, संगणक विभागप्रमुख डॉ.उदय नगरकर एमबीए एमसीएचे विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मेहता यांनी केले. मुंडे पुढे म्हणाले कि मतदानाच्या दिवशी सुट्टी न मानता आपले कर्तव्य बजावले पाहिजे तरच मतदानाची टक्केवारी वाढेल. मशीन वरील कोणत्याही उमेदवाराला किंवा एकही उमेदवार आवडत नसेल तर नोटा ला मतदान करा मात्र त्यादिवशी आपले कर्तव्य बजावा. यावेळी त्यांनी व्हीव्हीपॅट मशीन किंवा इतर मतदानशी निगडीत असणाऱ्या विविध मशीनची माहिती आणि त्याची कार्यप्रणाली याविषयी माहिती दिली.

विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना देखील त्यांनी उत्तरे दिली. ८५ वर्षापुढील नागरिकांना घरपोच मतदान करता येते यासाठी आवश्यक प्रक्रीयची देखील त्यांनी माहिती दिली. निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळ तसेच True Voter App याचे उपयोग देखील सांगितले. या उपक्रमातून निश्चितपणे विद्यार्थ्यामध्ये जागृती होऊन मतदानाचा टक्का वाढेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. नियोजन एमबीएच्या अनुष्का चौरे, कृष्णा शेंडे, साक्षी रच्चा या विद्यार्थ्यांनी केले.



मतदारांची उदासीनता दूर करण्यासाठी रॅली काढत मतदान जागृतीसाठी 'एम्प्रेस बाईकर्स' मध्ये सरसावलेल्या महिला.

# मतदान जनजागृतीसाठी सरसावल्या 'एम्प्रेस बाईकर्स'

### मतदारांची उदासीनता दूर करण्यासाठी रॅली काढत महिलांनी घेतला पुढाकार

नगर – विधानसभेची निवडणूक २० नोव्हेंबरला आहे. या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी जनजागृती करण्यासाठी नगरमधील महिलांच्या 'एम्प्रेस बाईकर्स' या ग्रूपने पुढाकार घेत शहरातून मतदान जनजागृती रॅली काढली. चौकाचौकांत जमा होऊन नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

परदेशांमध्ये निवडणुकीबाबत नागरिकांत कमालीची सजगता असते. मात्र, आपल्या भारतात मात्र निवडणुकीबाबत उदासीनता दिसते. मतदान करणे हा प्रत्येक मतदाराचा हक्क व जबाबदारी आहे, हे पटवून देण्यासाठी 'एम्प्रेस बाईकर्स'ने जनजागृती करण्याचे ठरले. त्यानुसार बंधन लॉनजवळील 'कॅफे अर्बन व्हिलेज' येथून रॅलीला प्रारंभ करण्यात आला. या वेळी महिलांनी पारंपारिक पोषाख परिधान केला होता. महिलांसाठी निवडणुकीवर आधारित विविध स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्यांना बक्षीसे देण्यात आली. नंतर बाईक रॅलीतील महिलांनी प्रथम सावेडीतील भिस्तबाग चौक, प्रोफेसर कॉलनी चौक, पारिजात चौक, तसेच आनंद धाम येथे रस्त्यावर जमा होऊन जनजागृतीपर एका पत्राचे वाचन केले.

यावेळी ग्रूपच्या सदस्या म्हणाल्या की, २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुका होत आहेत. मतदान हे आपले केवळ कर्तव्य नसून जबाबदारी आहे. मात्र, आपल्याकडे मतदानाबद्दल उदासीनता दिसून येते असा अहवाल निवडणूक अहवाल सांगतो. मागील विधानसभा निवडणुकीत ६०.३२ टक्के मतदान महाराष्ट्रात झाले. तर आपल्या नगर शहर मतदारसंघात फक्त ६२.३३ टक्के मतदान झाले. म्हणजे जवळपास ४०% लोक त्यांच्या कर्तव्यापासून मागे हटले. भारत हा आपला देश आहे, आणि आपल्या देशाला घडवण्याची जबाबदारी ही आपलीच आहे. त्यामुळे प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन या वेळी करण्यात आले. या अभियानास नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. या रॅलीमध्ये रचना काकडे, अनुराधा जाधव, प्रतिभा महामिने, सोनल बोरूडे, आरती खाडीलकर, विशाखा थापा, मीरा होले, आशा भालेराव, रसिका कायगावकर, वैशाली चोपडा, अल्पना कासवा, करिश्मा कोठारी, निशा नय्यर आदींसह अनेक सदस्यांनी सहभाग नोंदविला.

## जनजाती योद्धा भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगरीत १५ नोव्हेंबर रोजी शोभा यात्रेचे आयोजन



नगर – भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जनजाती क्रांतीकारकांच्या अमूल्य योगदानाच्या स्मृती समाजात चिरंतन राहण्यासाठी अहिल्यानगर जनजाती कल्याण आश्रमच्या वतीने जनजाती योद्धा भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर रोजी जनजाती गौरव दिवस साजरा करण्यात येणार आहे.

यानिमित्ताने सकाळी १० वाजता जुन्या बस स्थानकाजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच बडीसाजन मंगल कार्यालयात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती जनजाती कल्याण आश्रमाचे नगर संघटन मंत्री सोमनाथ पवार यांनी दिली.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जनजाती क्षेत्रातील क्रांतिकारकांचे अमूल्य योगदान समाजाला माहिती व्हावी यासाठी शोभायात्रेत त्यांची माहिती असणारे फलक असणार आहेत. शहरातील मिरवणूक मार्गावर या फिरून या शोभायात्रेचा समारोप बडीसाजन मंगल कार्यालयात होणार आहे.

येथे रा.स्व.संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमास लोक साहित्याच्या अभ्यासिका व सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित व प्रमुख वक्ते अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमाचे हितरक्षा प्रमुख संजय कुलकर्णी आदी उपस्थित राहणार आहेत.

या शोभायात्रेत व व्याख्यानास जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अहिल्यानगर जनजाती कल्याण आश्रमाच्या वतीने करण्यात आले आहे.


## Format C-1

*(for candidate to publish in Newspapers, TV)*

**Declaration about criminal cases**

*(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)*

**Name and address of candidate:** उत्कर्ष राजेंद्र गिते (तेलीखुंट, शेरकर गल्ली, सर्जेपुरा, नगर)

**Name of political party:** अपक्ष

*(Independent candidates should write "Independent" here)*

**Name of Election :** विधानसभा २२५

***Name of Constituency :** अहिल्यानगर (अहमदनगर)

I **Utkarsh Rajendra Gite** (name of candidate), a candidate for the abovementioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A) Pending criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | Chief Judicial Magistrate | 5870/23 | चालू आहे | M. G. आंदोलन |
| 2. | –''– | 282/24 | चालू आहे | प्रतिबंधक कायदा मोडल्याचा आरोप |
| 3. | –''– | 2009/23 | चालू आहे | मशिद भिंत तोडीचा आरोप |


## सर्व लहान लेकरांसाठी व संडेस्कूल विद्यार्थ्यांकरीता १४ नोव्हेंबरला बालदिनानिमित्त बूथ हॉस्पिटलमध्ये मोफत दंत तपासणी शिबीर

नगर – अनेक वर्षा पासून रुग्णांची सेवा निस्वार्थीपणाने करत असलेल्या द साल्वेशन आर्मी इव्हॅन्जलिन बूथ हॉस्पिटल बाल दिनाचे औचित्य साधून सर्व लहान लेकरांसाठी व संडेस्कूल विद्यार्थ्यांकरीता मोफात दंत तपासणी शिबिर आयोजित करण्यात येत आहे. दंत विकार ही समस्या बहुतेकांना आहेत. महागडे उपचार सर्व साधारण लोकांना परवरडणारे नसल्यामुळे अनेकजण उपचार घेणे टाळतात. यास्तव बूथ हॉस्पिटलने मोफत दंत तपासणी शिबीर आयोजित केली आहे. तसेच नोव्हेंबर महिन्यात दर गुरुवार, शुक्रवार व शनिवार सर्वांसाठी मोफत दंत तपासणी शिबिर आहे.

सुसज्ज दंत यंत्रणा उपलब्ध असलेल्या बूथ हॉस्पिटलमध्ये तपासणीसाठी आलेल्या रुग्णांकडून कोणतीही डॉक्टर तपासणी फी आकारली नाही.

या शिबिरामध्ये पूर्ण वेळ कार्यरत असलेल्या डॉ. ममता कांबळे (दंतरोग चिकित्स्क) (वेळ ९ ते ५) या वेळेत उपलब्ध असून तपासणी करणार असल्याची महिती बुथ हॉस्पिटल प्रशासक मेजर. देवदान कळकुंबे यांनी दिली. तसेच लहान लेकरांच्या दातांचे डॉक्टर. आशिष रवराळे व इत्यादी हे ही उपचार करण्यासाठी उपलब्ध आहेत.

या शिबिरामध्ये दातांची तपासणी मोफत आहे व तसेच दातासंबंधी सुचवलेले प्रक्रिया अल्प दरात आहेत. या शिबिराचा जास्तीत जस्त रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बुथ हॉस्पिटल प्रशासनाने केले आहे. संपर्क : ०२४१ – २३४५०५९, ८७८८०४३९४३, ब्र. प्रविण साबळे ९२७००७०८४६, ब्र. अमित पठारे ८९७५३७२२५४.


## Format C-1

*(for candidate to publish in Newspapers, TV)*

**Declaration about criminal cases**

*(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)*

**Name and address of candidate:** सचिन चंद्रभान डफळ (नक्षत्रनगर, तपोवन रोड, अहिल्यानगर)

**Name of political party:** महाराष्ट्र नवनिर्माण सेना

*(Independent candidates should write "Independent" here)*

**Name of Election :** विधानसभा २२५

***Name of Constituency :** अहिल्यानगर (अहमदनगर)

I **Sachin Chandrabhan Dafal** (name of candidate), a candidate for the abovementioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

| |
|---|
| **(A) Pending criminal cases - Ahmednagar** |
| **1) IPC Section -409,420, 34, Tophakhana Police Station RCC No. 877 / 2019, session Court Ahmednagar** |
| **2) IPC Section - 420, 34, Tophakhana Police Station RCC No. 1358 / 2022, session Court Ahmednagar** |
| **3) Punishment - NA** |
| **4) Punishment Imposed - NA** |



# परफेक्ट कॉम्बिनेशन

*निसर्गाने प्रत्येक जीवाला काही ना काही वरदान दिलं आहे. अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी काही गुणवैशिष्ट्यांची भेट दिली आहे. आता पक्ष्यांची ही जोडीच बघा ना... किती लय आहे त्यांच्या शरीररचनेत... मानेचं ते दिमाखदार वळण तर किती सुंदर! शुभ्र पांढऱ्या शरीराला केशरी चोच हे किती परफेक्ट कॉम्बिनेशन! खरंच...निसर्गनामक किमयागाराची थोरवी काय वर्णावी!*

# व्हिडिओ पाहून काढला रुग्णाचा ईसीजी!

'सोशल मीडिया'वर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये, एक वॉर्डबॉय यूट्युबवर व्हिडिओ पाहून रुग्णाचा ईसीजी करताना दिसत आहे. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर रुग्णालय प्रशासन सावध झाले असून वॉर्ड बॉयवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

दिवाळीनिमित्त रुग्णालयातील अन्य कर्मचारी रुग्णालयामध्ये अनुपस्थित होते. रुग्ण आजारपणाची तक्रार घेऊन आला, तेव्हा तिथे उपचारासाठी कुणीच नव्हते. त्यामुळे वॉर्ड बॉय रुग्णाची इलेक्ट्रोकार्डियोग्राम (ईसीजी) चाचणी घेत असल्याचे दिसून आले आहे. लोकांचा विरोध असूनही त्यांना न जुमानता तो युट्युब पाहून रुग्णाचा 'ईसीजी' काढत होता. नकार देऊनही वॉर्डबॉय ऐकायला तयार नव्हता. वॉर्ड बॉयला 'ईसीजी'चाचणी कशी करायची हे कळत नाही. दिवाळी असल्याने रुग्णालयात तंत्रज्ञ आणि वैद्यकीय कर्मचारी उपस्थित नव्हते. त्यामुळे ईसीजी चाचणी करत असल्याचेही त्यांनी सांगितले. ही एक महत्त्वाची चाचणी आहे. यामुळे रुग्णाचा जीव जाऊ शकतो. वॉर्डबॉयने तपासणी सुरू ठेवली. तो म्हणाला, हो, मी ही चाचणी प्रथमच करत आहे. पण त्यात काही अडचण आहे का? 'सोशल मीडिया'वर व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर, जोधपूर मेडिकल कॉलेजचे प्रमुख बी.एस. जोधा यांनी या प्रकरणाची चौकशी सुरू केली आणि आरोपी वॉर्डबॉयवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.



# कॅलिडोस्कोप

## फ्लाईट अटेंडटची नोकरी सोडून 'वेगळे' काम!

पैसे कोणाला नको हवे असतात? प्रत्येकाला मेहनत करून जास्त पैसे कमवायचे असतात. यासाठी अनेक वेळा लोक आपले काम आणि व्यवसाय बदलतात. एका २१ वर्षाच्या मुलीनेही असेच केले. ती फ्लाइट अटेंडंट होती आणि तिच्या नोकरीसाठी तिला बरेच दिवस घर आणि कुटुंबापासून दूर राहावे लागले. यानंतर मुलीने नोकरी सोडून घरातून 'वेगळे' काम सुरू करण्याचा निर्णय घेतला. आता ही मुलगी म्हणते, की पूर्वी मी एका महिन्यात जेवढी कमाई करत असे, तेवढे एकाच दिवसांत करते. अलाना पॉव नावाच्या २१ वर्षीय मुलीने फ्लाइट अटेंडंट बनण्याचे प्रशिक्षण घेतले आणि नंतर नोकरीसाठी जगभर प्रवास केला. तिने सांगितले, की दिवसांतून १४ तास काम करणे आणि घरापासून दूर राहणे अनेकदा एकटे आणि थकवणारे होते. अलाना दिसायला सुंदर होती आणि थोडी बोल्डसुद्धा, त्यामुळे लोक तिच्या सौंदर्याचे वेडे होते. 'सोशल मीडिया'वर फोटो शेअर केल्यानंतर, लोक विचारत, की तिच्याकडे कोणतेही 'ॲडल्ट पेज' आहे का? येथूनच अलानाला नवीन कामाची माहिती मिळाली आणि त्यानंतर तिने नोकरी सोडली. ऑस्ट्रेलियाची रहिवासी असलेल्या अलानाने सांगितले की, अनेकवेळा सहकारी गमतीने म्हणायचे की मी 'डल्ट पेज'बनवावे; पण मला तसली मुलगी व्हायचे नव्हते. तथापि, मला मिळणाऱ्या प्रतिक्रिया पाहता, मी प्रयत्न करण्याचे ठरवले. आता अलाना यशस्वी झाली आहे आणि ती म्हणते, की तिने हे काम लवकर केले असते, तिची नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. तिने पहिल्या महिन्यातच तब्बल ६०,००० ऑस्ट्रेलियन डॉलर्स (३२ रुपये) कमावले आहेत.



# चोरीचे ३७ रुपये ५४ वर्षांनी व्याजासह परत



उधारी आणि चोरी हे दोन भिन्न शब्द आहेत. कोणी पैसे चोरतो, कोणी कर्ज घेतल्यावर विसरतो किंवा आपली इज्जत विकून परत करण्यास नकार देतो. लोक लाखो रुपयांची चोरी करतात आणि मागे वळून पाहत नाहीत; पण अशीही एक व्यक्ती आहे, जिने ५४ वर्षांपूर्वी चोरीला गेलेले ३७ रुपये व्याजासह परत करण्याचे ठरवले आणि ते परत केले.

रणजीत नावाच्या या व्यक्तीने १९७० मध्ये ३७ रुपये चोरले होते. या पैशाची चोरी आता रणजीतला आतून खात होती. रणजीत त्या वेळी गरीब होता. तो श्रीलंकेतील नुवारा भागातील एका चहाच्या मळ्याजवळ राहायचा आणि मजूर म्हणून काम करायचा. एके दिवशी, एका मळ्यात काम करणाऱ्या जोडप्याने नवीन घरात शिफ्ट होत असताना त्यांना त्यांच्या घरातील वस्तू गोळा करण्यासाठी बोलावले. सामान बाहेर काढत असताना त्याला उशीखाली ३७ रुपये सापडले. आजच्या काळात ही रक्कम खूपच कमी आहे; पण ७० च्या दशकात गरीब व्यक्तीसाठी ती खूप मोठी रक्कम होती. त्यामुळे रणजितने चोरीच्या उद्देशाने ३७ रुपये काढून खिशात ठेवले. हे कुटुंब श्रीलंकेत राहत होते. काही वेळाने घरमालक मसुफ सगुई यांना आपण उशीखाली ३७ रुपये ठेवल्याचे लक्षात आल्याने त्यांनी रणजीतला विचारपूस केली; मात्र रणजीतने यावर कोणतेही उत्तर दिले नाही. रणजीतचे आई-वडील चहाच्या बागेत काम करायचे आणि त्याचे कुटुंब खूप मोठे होते. त्यामुळे अपुऱ्या उत्पन्नामुळे त्याला शालेय शिक्षणही पूर्ण करता आले नाही. वयाच्या १७ व्या वर्षी रणजीतने तामिळनाडूला जाण्याचा निर्णय घेतला.

# पाल्यांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपमधून जुळले प्रेम

प्रेम आणि युद्धात सर्व काही न्याय्य असते अशी एक म्हण आहे. अशीच एक घटना समोर आली आहे. जेथे शाळेने मुलांच्या वर्गातील पालकांचा एक ग्रुप बनवला होता. ज्यामध्ये मुलांना दिलेला गृहपाठ शेअर केला जात होता; पण यामुळे दोन विवाहित जोडप्यांमध्ये मैत्री झाली. क्लास ग्रुप संभाषण दरम्यान दोघांनी एकमेकांशी संपर्क साधला आणि हळूहळू त्यांच्यात जवळीक वाढू लागली. गृहपाठ आणि मुलांच्या शिक्षणावर लक्ष ठेवण्यासाठी हा चॅट ग्रुप शाळेने तयार केला होता. पण यामुळे भलतेच काही घडले. दोघेही पालकांचे संभाषण सुरू झाले. जे प्रेम प्रकरणापर्यंत पोहोचले; पण नंतर जे घडले, त्याने सगळ्यांनाच धक्का बसला. कारण ते दोघेही आपापल्या कुटुंबाला सोडून पळून गेले. झांग आणि वेन अशी या दोघांची नावे आहेत. ही घटना चीनमध्ये घडली आहे; पण यापासून सगळ्यांच शाळांनी धडा घेतला आहे. झांग यांना चार तर वेन यांना दोन मुले होती. दोघेही मुलांना सोडून पळून गेले. मुलांच्या गृहपाठावर बोलता बोलता ते कधी प्रेमात पडले, हे त्यांनादेखील कळाले नाही. ही गोष्ट सोशल मीडियावरुन समोर आली. झांग म्हणाली, की ती तिच्या पतीच्या कौटुंबिक हिंसाचाराला कंटळली होती, ज्यामुळे तिच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम झाला होता. पती तिला मारहाण करायचा. झांगने वेनला पळून जाऊन नवीन जीवन सुरू करण्यास सुचवले. यानंतर, घटस्फोट न घेता, वेन झांगसोबत ६८० किलोमीटर दूर असलेल्या टियांजिन शहरात गेले तेथे ते दोघेही पाच वर्षे एकत्र राहिले.



# ड्रोनचा असाही वापर...

घाना या आफ्रिकेतल्या गरीब म्हणवल्या जाणाऱ्या देशात मेडिकल ड्रोन सेवा सुरू करण्यात आली असून ही जगातली सर्वात मोठी वैद्यकीय ड्रोन सेवा असल्याचं बोललं जातं. देशात वैद्यकीय कारणांसाठी दररोज ड्रोन्सची ६०० उड्डाणं होणार आहेत. देशातल्या जवळपास १,२०,००० नागरिकांना याचे लाभ होतील. ड्रोनच्या माध्यमातून इथल्या दोन हजार आरोग्य केंद्रांमध्ये विविध रोगांवरच्या लसी, रक्त तसंच औषधांचा पुरवठा केला जातो. ड्रोनसेवेसाठी देशात चार हब तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक हबमध्ये ३० ड्रोन असून कॅलिफोर्नियाच्या 'झिपलाईन' या कंपनीने ते तयार केले आहेत. अर्थात अशाप्रकारे ड्रोन सेवा सुरू करण्यावर सुरूवातीला आक्षेप घेण्यात आले होते. ड्रोन सेवा सुरू करण्याऐवजी देशातली आरोग्यसेवा अद्ययावर करण्यावर सरकारने भर देणं गरजेचं असल्याचं काहींचं म्हणणं होतं. घाना मेडिकल असोसिएशनने या सेवेच्या प्राथमिक चाचणीची मागणी केली होती. ड्रोन्सच्या वापरामुळे वैद्यकीय क्षेत्राला फारसा लाभ होणार नसल्याचं त्यांचं म्हणणं होतं. पण घानाच्या लोकसभेत हा प्रस्ताव ठेवण्यात आला आणि १०२ विरुद्ध ५८ एवढ्या मतांनी तो मंजूरही झाला. त्यामुळे घानामध्ये ही सेवा सुरू झाली आहे. या सेवेसाठी घाना सरकारने 'झिपलाईन'ला १२ दशलक्ष डॉलर म्हणजे ८४ कोटी रुपये दिले आहेत. मेडिकल ड्रोन सेवेमुळे रुग्णांवर लवकर उपचार व्हायला मदत होईल, असं घानाच्या अध्यक्षांचं म्हणणं आहे.





# सोन्याचा बाथटब

जपानमधल्या एका रेस्टॉरंटमध्ये सोन्याचा बाथटब तयार करण्यात आला. १३० सेंटीमीटर रूंद आणि ५५ सेंटीमीटर खोल असलेल्या या टबमध्ये बसून आंघोळ करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. भाडं देऊन एक ते दहा तासांसाठी या टबमध्ये निवांत डुंबता येईल. एका तासाच्या वापरासाठी ग्राहकांना काही येन म्हणजे भारतीय चलनात तीन हजार रुपये भाडं भरावं लागेल. १८ कॅरेट सोन्यापासून बनवण्यात आलेला हा जगातला पहिलाच बाथटब असल्याचा या रेस्टॉरंटचा दावा आहे. इथल्या 'हॉट स्प्रिंग' रेस्टॉरंटने हा अनोखा टब तयार करून घेतला असून तो पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरत



# ग्रीनलँडची बिकट वाट

ग्रीनलँडमध्ये सतत बर्फ पडत असतो. इथलं सर्वसाधारण तापमान उणे २५ अंश सेल्सियस असतं. थंडीत ते उणे ६० अंशांपर्यंत जातं. या संपूर्ण बेटावर फक्त ५७,००० लोक राहतात. पूर्व ग्रीनलँडमध्येही लोकवस्ती आहे. पण हे स्थान मुख्य प्रवाहापासून खूप लांब आहे. इथे तुम्हाला वाहन दिसणार नाही की मोबाईलला सिग्नल मिळणार नाही. इथलं इत्तोकोरतूर्मित हे गाव समुद्राच्या किनारी वसलं आहे. थंडीत या समुद्राचं पाणी गोठून जातं. इथे एक गेस्ट हाउसही आहे. मात्र प्रतिकूल तापमान आणि फारशा सोयीसुविधा नसल्यामुळे पर्यटक इथे फिरकत नाहीत. मात्र एके दिवशी या ठिकाणीही पर्यटकांची गर्दी होईल, अशी इथल्या लोकांना आशा वाटते. ग्रीनलँड हे जगातलं सर्वात मोठं बेट आहे. नूक ही ग्रीनलँडची राजधानी. या शहराची लोकसंख्या फक्त १९ हजार आहे. जागतिक तापमानवाढीचा फटका ग्रीनलँडलाही बसू लागला आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत इथला समुद्र सप्टेंबरमध्येच गोठलेला असायचा. मात्र आता नोव्हेंबरनंतरच तो गोठू लागतो, असं इथले स्थानिक सांगतात. ध्रुवीय अस्वलंही आता शहरात येऊ लागली आहे. पूर्वी हे प्रमाण नगण्य होतं. अस्वलं आणि माणूस यांच्यात द्वंद्व पहायला मिळतं. इथल्या घरांना गरम ठेवण्यासाठी सेंट्रल हिटिंग सिस्टिमचा वापर केला जातो. इथले लोक रेनडिअरचं मांस आणि आर्टिक ४ नावाचा मासा खातात.

# यूएईची 'मिनिस्टरी ऑफ पॉसिबिलिटीज'

संयुक्त अरब अमिरातीने एका अनोख्या मंत्रालयाची संकल्पना मांडली. 'मिनिस्टरी ऑफ पॉलिबिलिटीज' असं या मंत्रालयाचं नाव आहे. विशेष म्हणजे या मंत्रालयाला कोणताही मंत्री नसतो. या मंत्रालयाची जबाबदारी कॅबिनेट सदस्यांकडे असेल. देशाशी संबंधित महत्त्वाच्या मुद्यांवर या मंत्रालयात चर्चा होईल. तसंच भविष्याच्या दृष्टीने योग्य अशी सरकारी सिस्टिम तयार करण्यात हे मंत्रालय मदत करणार आहे. अशाप्रकारचं हे जगातलं पहिलंच मंत्रालय आहे. हे मंत्रालय देशातल्या युवा गुणवत्तेला शोधण्यासाठी वेगळ्या योजना आखेल. देशवासीयांना सर्व सोयीसुविधांचा लाभ लवकरात लवकर मिळावा या दृष्टीनेही काही योजना आखल्या जाणार आहेत. 'मिनिस्टरी ऑफ पॉसिबिलिटीज' ऑनलाईन व्यासपीठ उपलब्ध करून देणार आहे. यामुळे ६० दिवसात होणारी कामं सहा दिवसात होतील, असं त्यांचं म्हणणं आहे. तसंच लोकांना वारंवार सरकारी कचेऱ्यांच्या खेपाही घालाव्या लागणार नाहीत.



# मृत्यू महाग झाला!

हाँगकाँगमध्ये जमिनीचे दर प्रचंड वाढले आहेत. अस्थी पुरण्यासाठीही जमीन उपलब्ध होत नसल्याचं चित्र इथे दिसून येतं. या कामासाठी जमिनीचा छोटा तुकडा घ्यायचा म्हटला तरी तिथल्या नागरिकांना भरावी लागणारी रक्कम भारतीय चलनात ६२ लाख रुपये एवढी आहे. जमिनीच्या वाढत्या अस्थिकलश पडून आहेत. ते अजूनही पुरण्यात आलेले नाहीत. हाँगकाँगमध्ये मृतांचे अस्थिकलश पुरले जातात. मात्र जमिनीच्या किंमती गगनाला भिडल्यामुळे अनेकांनी हे अस्थिकलश लॉकरमध्ये ठेवले आहेत. अस्थिकलश पुरण्यासाठी जमीन घ्यायची तर लाखो पाउंड खर्च संस्कारांसाठी जमीनच शिल्लक नसल्यामुळे ही परिस्थिती उद्भवली आहे. सरकारी लॉकरमध्येही हे अस्थिकलश ठेवले जातात. यासाठी २८०० हाँगकाँग डॉलर म्हणजे २२ हजार रुपये भरावे लागतात. पण हे लॉकरही बुक झाले आहेत. सरकारी लॉकरमधल्या जागेसाठी इथल्या लोकांना चार वर्षं वाट बघावी लागते. अस्थिकलश पुरण्याची सोय उपलब्ध करून

## 'सिद्धार्थ वाणी'

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी म.सा. आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है।



### "सन्मति"

घरगुती जीवनात आत्म्याला अनेक गोष्टीची आवश्यकता असते. सर्वप्रथम एखादी व्यक्ती देवाकडून बुद्धी मागते. त्याला मान्यता मिळवायची आहे. तो कोणतेही वाईट काम करू शकत नाही. त्याला अशी बुद्धी दे, जर कोणी हे मागायला शिकले तर तो आपले जीवन धन्य बनवू शकतो. आज कोणी देवाकडे पुत्र आणि नातवंडे मागत आहे. कोणीतरी इंद्रियसुखांसाठी विनंती करत आहे. माणूस आयुष्यात फक्त तीनच गोष्टी मागतो. सर्वप्रथम त्याला मोठे हृदय द्या, जेणेकरून देव त्याच्यावर आनंदाचा वर्षाव करील. तो त्याच्या दुःखाचा काळ देखील हसत हसत पार करेल आणि तिसरे आरोग्य आहे, लोगस्सच्या मजकुरात लिहिलेले आहे :- अरूग्गबोहि लाभं समाहिवर गुत्तम दिंतु । व्यक्ति समाधि हवी असते, जेव्हा एखादी व्यक्ती कायोत्सर्ग करते. त्याचं मुर्ख मन हे बघत राहतं की त्याच्या शेजारी कोण बसलंय? दारात कोण येतंय? शालिभद्र आणि धनकुमार यांनी पर्वतावर जाऊन पदोपगण संथारा केला. त्यात उघड्या डोळ्यांनीही पाहणे समाविष्ट नाही. शालिभद्राची आई भद्रा आपल्या मुलाला भेटण्याच्या आशेने पर्वतावर आली. त्याने आपल्या मुलाला बोलावले. शालिभद्राने एकदाच डोळे उघडले आणि आईला बघितले. त्यांची मुक्तता क्षणभर थांबली. आंतरिक आणि बाह्य आरोग्य असावे. बोधिलाभान म्हणजे उत्तम बुद्धिमत्ता सर्व पाप मुर्खपणामुळे होतात. तिसरी गोष्ट माणसाने मागितली पाहिजे. ती म्हणजे त्याने आपले जीवन सहिष्णुतेने जगावे. सर्व व्यसने हिंसा, पापे, आस, समाधीत होतात. सहिष्णुतेचा खरा अर्थ माणसाने समाधीत जाणे हा आहे. माणसाने समानता विकसित केली पाहिजे. त्याची जीवन क्षमता आपोआप वाढेल. माणसाच्या आयुष्यात क्षमता असते. तो धीर धरणारा असतो आणि फक्त धीर देणारा माणूसच माणसाची चूक माफ करू शकते. क्षमाशीलता विकसित करण्यासाठी क्षमता विकसित करणे आवश्यक आहे.

एक त्याग आणि एक वैराग्य असे दोन शब्द आहेत. त्यागात आसक्ती असते. अन्न काही काळ शिल्लक आहे. त्यागात सर्व काही मागे पडते. या जगात माणसाला पैसा, काम, नाव, शक्तीचा ध्यास लागतो. आर्थिक हितसंबंध जपणारी व्यक्ती संपत्तीत गढून जाते. संपत्तीद्वारे सुख प्राप्त करण्याची इच्छा असते. हीच व्यक्ति तासभर फोन, टेलिव्हिजन, फिरणे यात करमणूक वाटते. जोपर्यंत तो फिरतो, बोलतो, पाहतो त्याला वेळेचे महत्त्व नाही. त्यानंतर त्याचा वेळ वाया गेल्याचे त्याच्या लक्षात येते. ही इंद्रियांशी आसक्तीची अवस्था आहे. जो मनुष्य सुखाच्या इच्छांचा सतत त्याग करतो तोच पापी कर्मापासून मुक्त होतो. सुख आणि दुःखात समानता आहे. अज्ञानी जीव गोष्टीत आनंद मानतो. त्याच्या डोळ्यांवर आसक्तीची पट्टी आहे ते उघडावे लागेल. आपण कशाला जास्त सन्मति द्यावी हे ठरवावे.– **सौ. सविता चोरडिया**

# आजची थोडीशी गैरसोय.. उद्याच्या शाश्वत विकासाची पायाभरणी

## शहर खड्डेमुक्त करण्याचा निर्धार



आ.संग्राम जगताप

**माझ्या नगरकरांशी हितगुज - भाग २**

नगर शहर हे मोठे खेडे आहे. खड्यांचे शहर आहे, असे हिणवले जायचे. ते ऐकताना शहराची ओळख आदराने करून दिली जाईल, असे काम करण्याचा निश्चय केला. नगरकरांनी मला आमदारपदी विराजमान केल्यावर मोठे खेडे ही ओळख पुसून टाकत नगरला शहराचा दर्जा मिळवून देण्यासाठी अविश्रांत राबलो. दुसरे वेळी आमदार झाल्यावर शहराच्या विकासाचे दूरदृष्टीने नियोजन करून महाराष्ट्र सरकारकडून निधी मिळवत कार्यारंभ केला.

नगरच्या इतिहासात प्रथमच रस्ते विकासासाठी साडेपाचशे कोटींचा भरीव निधी राज्य शासनाकडून मिळवण्यात यश मिळाले. या निधीपैकी पहिल्या टप्प्यातील कामांसाठी १५० कोटींचा निधी उपलब्ध झाला आहे. त्यामधून शहर व उपनगरांमध्ये रस्त्यांच्या कामांना सुरुवात केली आहे. शहरातील प्रमुख रस्ते प्रशस्त व काँक्रिटचे करताना ते दीर्घकाळ टिकणारे असावेत यावर लक्ष केंद्रित केले आहे. मॉडेल रस्ते तयार करण्यावर भर दिला. डीपी रस्त्यांचे काँक्रिटिकरण करताना पुढील अनेक वर्षांचा विचार केला आहे. त्यामुळे आज शहरात रस्ते विकासाची जी भरीव कामे चालू आहेत ती नगरच्या मोठ्या प्रगतीची पायाभरणीच ठरणार आहेत. मोठ्या रस्त्यांबरोबरच अंतर्गत रस्ते मजबूत करून शहर खड्डेमुक्त करण्याचा निर्धार केला आहे.

बोल्हेगाव येथील रस्त्यांचे रूंदीकरण व मजबुतीकरण सुरू केले आहे. पाईपलाईन आणि गुलमोहोर रोड प्रशस्त झाले आहेत. पोलिस अधीक्षक चौक ते पत्रकार चौक ते लालटाकी ते न्यू आर्टस कॉलेज या रस्त्याचे काँक्रिटिकरण सुरू केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते माळीवाडा ते माणिक चौक ते कापडबाजार ते लालटाकी पर्यंतचा रस्ता मजबूत होत आहे. शहरातील जिल्हा वाचनालय ते लक्ष्मीकारंजा ते नालेगाव अमरधामपर्यंतच्या रस्त्याचे काम सुरू आहे. केडगाव उपनगरातील दोन प्रमुख रस्त्यांमुळे कल्याण महामार्ग व पुणे महामार्ग जोडले जात आहेत. बुरुडगाव रोडचे काँक्रिटिकरण पूर्ण झाले आहे. शहराच्या अनेक भागातील रस्त्यांची कामे पूर्ण होत आली आहेत. पुढील ३० वर्षांचा विचार करून रस्त्यांची कामे हाती घेताना अगोदर जमिनीखालील ड्रेनेज, पाईपलाईन, गॅस पाईपलाईन अशी सर्व कामे पूर्ण केली. शहर व उपनगरांतील अनेक प्रभागांतील अंतर्गत रस्तेही तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार काँक्रिटचे करण्यात आले आहेत. त्यामुळे शहरातील दळणवळण गतिमान होईल.

संपूर्ण नगर शहर हे माझं घर आहे असे मानून मी काम करीत आहे. रस्त्यांसाठी निधी आणण्याचे नियोजन दोन वर्षांपूर्वी केले. इस्टिमेट तयार करणे, जिल्हाधिकारी कार्यालयातून मंजूरी, विभागीय आयुक्त कार्यालयातून मंजुरी मिळाल्यावर मंत्रालयात मंजूरी मिळाली की, नगर विकास विभाग, अर्थ विभाग त्यावर शिक्कामोर्तब करून निधी मंजूर होतो. ही प्रक्रिया वेळखाऊ असली तरी मी सातत्याने पाठपुरावा करून मंजुरी प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. दरम्यानच्या काळात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने निविदा प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. पुढे आचारसंहिता उठताच निविदा प्रक्रिया पूर्ण करून ठेकेदारांना कार्यारंभ आदेश देण्यात आले.

रस्त्यांच्या कामांमुळे नगरकरांची गैरसोय नक्कीच होत आहे याची मला जाणीव आहे. कारण मी सुध्दा याच रस्त्यावरून फिरतो. पण ही गैरसोय उद्याच्या भविष्याची भक्कम पायाभरणी आहे. माझ्या नगर शहराचा विकास हे माझ्यासमोरील एकमेव लक्ष्य आहे. आगामी काळात ४०० कोटींचा निधी उपलब्ध होवून रस्ते विकासाचे नियोजित काम यशस्वीरित्या पूर्ण होईल. शहर विकासाचे व्हिजन डोळ्यांसमोर ठेवून कार्यरत असल्याने नगरकरांनी सलग तिसरे वेळी मला आमदार करून विकास कामे विनाखंड सुरू रहावीत, असा विचार केलेला दिसून येत आहे.

# सेवावृत्तीने फक्त आणि फक्त मातृभूमी नगरसाठीच पूर्णवेळ काम करण्याची भूमिका : संग्राम जगताप






अहिल्यानगर शहरातील पन्नास हून अधिक विविध व्यापाऱ्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप. यावेळी पदाधिकारी व व्यापारी उपस्थित होते.

नगर – माझे सरकार दरबारी भरपूर वजन आहे. या वजनाचा उपयोग काही फालतू गोष्टींसाठी न करता सरकारकडून मोठा विकासनिधी मंजूर करून आणण्याला प्राधान्य देण्यासाठी केला आहे. 'मेरेपास भगवान का दिया सबकुछ है...' त्यामुळे सेवावृत्तीने फक्त आणि फक्त आपल्या मातृभूमीसाठीच पूर्णवेळ काम करण्याची माझी भूमिका आहे. राज्याच्या नकाश्यावर विकसित नगर शहर म्हणून वेगळी ओळख निर्माण करून भविष्यात आपले शहर हे मेट्रोसिटी करायचे आहे. यासाठी सर्वांची साथ मला हवी आहे. अहिल्यानगर मधील तब्बल ५३ व्यापारी संघटनांनी मला पाठींबा दिल्याबद्दल मी सर्वांच्या ऋणात राहील, असे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांनी केले.

अहिल्यानगर शहरातील ५० हून अधिक विविध व्यापाऱ्यांच्या संघटनांनी महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांना पाठिंबा जाहीर केला आहे. यानिमित्त मंगळवारी सायंकाळी व्यापक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व संघटनांचे पदाधिकारी, व्यापारी, उद्योजक उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार अरुण जगताप, उमेदवार संग्राम जगताप, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, संतोष बोथरा, डाळ मंडई आडतेबाजार मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष अशोक गांधी, सराफ संघटनेचे अध्यक्ष सुभाष कायगावकर, इंडस्ट्रियल इस्टेटचे अध्यक्ष अरविंद गुंदेचा, जॉगरी असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र बोथरा, मिरची मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष गोपाळ मणियार, आदर्श व्यापारी संघटनेचे अध्यक्ष संजय चोपडा, क्रेडाईचे अध्यक्ष अमित मुथा, भाजी फळ फूल व्यापारी असोसिएशनचे व्यापारी संघटनेचे अध्यक्ष अशोक लाटे, उद्योजक व रामकृष्ण क्रेडिट सोसायटीचे चेअरमन श्रीगोपाल धूत, हॉटेल व्यवसायिक संघटनेचे अध्यक्ष प्रदीप पंजाबी, अण्णासाहेब मुनोत, अनिल पोखरणा, अमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, कापड बाजार असोसिएशनचे अध्यक्ष श्याम देडगावकर, आदेश चंगेडीया, राजेश भंडारी, सिंधी समाजाचे अध्यक्ष महेश मध्यन, सुरेश हिरानंदानी, प्रकाश गांधी, अविनाश घुले, गणेश भोसले, प्रकाश भागानगरे, संतोष बोरा, जय रंगलानी, ठाकूर नवलानी, राजेंद्र चोपडा, पोपट भंडारी, अशोक भंडारी, डॉ. विजय भंडारी, भाजपचे नेते सुवेंद्र गांधी आदींसह उपस्थित होते.

आ.जगताप पुढे म्हणाले, नगर शहर बदलत असल्यानेच शहरीकरणाला व्यापारी, उद्योग क्षेत्राला चालना देण्यासाठी गेल्या १० वर्षांपासून शहर विकासाचे नियोजन करत आहे. औद्योगिक क्षेत्र वाढून रोजगार वाढवा यासाठी विळदमध्ये ६०० एकर क्षेत्रात नव्या एमआयडीसीसाठी जागा मंजूर झाली आहे. हे नगर विकासाचे महत्वाचे पाउल आपण टाकत आहोत. पुढील १५ ते २० वर्षांचा विचार करून शहरातील सर्व डीपी रस्त्यांचे दर्जेदार कामे सुरु आहेत.

नरेंद्र फिरोदिया म्हणाले, आ.संग्राम जगताप यांनी केलेल्या कामांमुळे शहराचा विकासाचा वेग वाढला आहे. कोरोना संकट काळातही आ. जगताप यांनी केलेले मदत कार्य अतुलनीय आहे. असे उत्कृष्ट काम करणारे संग्राम जगताप यांना तिसऱ्यांदा निवडून आणण्यासाठी आपण सर्वांनी काम करावे.

श्रीगोपाल धूत म्हणाले, आ.संग्राम जगताप यांना पाठींबा देण्यासाठी प्रथमच एवढ्या मोठ्या संख्येने व्यापारी एकवटला आहे, हि विजयाची पावतीच आहे. जगताप परिवार नम्रपणे व्यापाऱ्यांच्या मागे उभा आहे.

यावेळी जयद्रथ खाकाळ यांनी आ.जगताप यांनी एमआयडीसीमध्ये दिलेल्या सुविधांची माहिती दिली. संतोष बोथरा यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन कमलेश भंडारी यांनी केले, संतोष बोथरा यांनी स्वागत केले. विपुल शेटिया यांनी आभार मानले.

# निवडणूक लोकशाही पद्धतीने करा, धमक्या, दडपशाही कराल तर याद राखा

## महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांचा विरोधकांना इशारा; भिंगार परिसरात प्रचार फेरी काढत नागरिकांशी साधला संवाद

नगर – नगर शहर मतदार संघात पायाखालची वाळू सरकू लागल्याने विरोधी उमेदवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांकडून महाविकास आघाडीचे कार्यकर्ते, सर्वसामान्य नागरिक यांना धमक्या दिल्या जात आहेत. दडपशाही केली जात आहे, असा आरोप करत निवडणूक लोकशाही पद्धतीने करा अन्यथा महाविकास आघाडीची सत्ता आल्यावर तुम्हाला उंदरासारखे बिळात लपून बसावे लागेल. असा इशारा महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांनी विरोधकांना दिला आहे.

नगर शहर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांनी भिंगार परिसरात प्रचार फेरी आयोजित केली, ज्यामध्ये नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या प्रचार फेरीत महाविकास आघाडीच्या महिला कार्यकर्त्या स्मिता अष्टेकर यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते, आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभिषेक कळमकर यांनी जनतेशी संवाद साधून त्यांच्या समस्या, अपेक्षा, आणि मागण्या जाणून घेतल्या. तसेच विरोधकांवर जोरदार निशाणा साधत महाविकास आघाडीला नागरिकांचा मिळणारा प्रतिसाद पाहून विरोधी उमेदवाराच्या बगलबच्चांची चुळबुळ सुरु झाली आहे. तुम्हाला काय इव्हेंटबाजी करायचीय, पैसा उधळायचाय तो उधळा, तुमचा नेता राजा असेल पण मी लढवय्या योद्धा आहे. त्यामुळे तुमच्या धाक दडपशाहीला भिक घालणार नाही असा इशाराही त्यांनी यावेळी बोलताना दिला.

यावेळी भिंगार परिसरातील नागरिकांनी त्यांना सकारात्मक प्रतिसाद देत शहराच्या विकासासाठी त्यांच्यासोबत खंबीरपणे उभे राहणार असल्याचे सांगितले. या प्रचार फेरीत महिलांचा सहभाग विशेष उल्लेखनीय होता. परिसरातील माता–भगिनींनी कळमकर यांचे औक्षण करून विजयी भव असा आशीर्वाद दिला. नगर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महाविकास आघाडीच्या तुतारी वाजवणार माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून कळमकर यांना विजयी करण्याचा निर्धार केला.

यावेळी महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, आणि स्थानिक नागरिकांनी एकत्र येत अभिषेक कळमकर यांच्या नेतृत्वाखाली नगर शहरात विकास आणि परिवर्तन घडवून आणण्याचा विश्वास व्यक्त केला.



भिंगार परिसरातील महिलांनी महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांना औक्षण केले.







महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांचे स्वागत करताना एमआयडीसीमधील उद्योजक. दुसऱ्या छयाचित्रात दादाभाऊ कळमकर यांचाही सत्कार करण्यात आला तर तिसऱ्या छायाचित्रात व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधताना डॉ. सत्यजित तांबे.

# औद्योगिक विकासासाठी गुंतवणूकदारांना सुरक्षित वातावरण देणार : अभिषेक कळमकर

## अहमदनगर, एमआयडीसीमधील उद्योजकांसोबत बैठक

नगर – प्रचाराच्या निमित्ताने महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांनी अहमदनगर एमआयडीसीमधील उद्योजकांसोबत बैठक घेतली. या बैठकीला एमआयडीसीमधील सुमारे २५० ते ३०० उद्योजक उपस्थित होते. या सोबतच महाविकास आघाडीचे किरण काळे, विक्रम राठोड, बाळासाहेब बोराटे, भगवान फुलसौंदर, रवी वाकळे, दिलीप सातपुते, संभाजी कदम उपस्थित होते.

बैठकीत उद्योजकांनी औद्योगिक विकासासंबंधी अनेक मुद्दे मांडले आणि शहरातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी योग्य उपाययोजना व विशेष प्रोत्साहन देण्याची मागणी केली. उद्योजकांच्या समस्यांना लक्षपूर्वक ऐकल्यानंतर अभिषेक कळमकर यांनी उद्योजकांना दिलासा देत एमआयडीसी परिसरातील औद्योगिक वातावरणाला सुरक्षित बनवण्यासाठी आणि उद्योगांच्या प्रगतीसाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन दिले.

### औद्योगिक विकासास प्रोत्साहन देणाऱ्या योजना

अभिषेक कळमकर यांनी आश्वासन दिले की, नगर एमआयडीसीच्या औद्योगिक विकासासाठी विशेष प्रयत्न केले जातील. उद्योगांच्या विविध गरजा आणि अडचणी लक्षात घेऊन कोणत्याही प्रकारचे दबावतंत्र अथवा गुंडगिरी सहन केली जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी उद्योग क्षेत्राला सुरक्षिततेची हमी दिली.

याशिवाय कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीने विशेष कामगार रुग्णालयाची स्थापना करण्याची योजना त्यांनी मांडली, ज्यामुळे कामगारांना आवश्यक असलेल्या वैद्यकीय सुविधांचा लाभ घेता येईल. कामगारांच्या हितासाठी आधुनिक दर्जेदार निवास व्यवस्था, पिण्याचे शुद्ध पाणी, वीज, रस्ते आणि सुरक्षित वातावरणाची हमी देण्याचे आश्वासन देखील त्यांनी दिले.

### सत्यजित तांबे यांचा महत्वाचा संवाद

बैठकीत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधताना सत्यजित तांबे यांनी औद्योगिक विकासासाठी सुरक्षित वातावरणाचे महत्त्व अधोरेखित केले. सध्या नगर एमआयडीसीमध्ये गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण नाही कारण उद्योजकांना सुरक्षेची हमी मिळत नाही. यंदाच्या निवडणुकीत सुशिक्षित आणि सुज्ञ उमेदवार निवडून दिल्यास नगरच्या औद्योगिक विकासाला चालना मिळेल, असे प्रतिपादन त्यांनी केले. तांबेंनी उद्योजकांना आश्वस्त करत सुरक्षिततेसाठी योग्य पावले उचलण्याचा निर्धार व्यक्त केला.

दादाभाऊ कळमकर यावेळी बोलताना म्हणाले, पवार साहेबांनी शब्द दिलेला आहे सगळी ताकद लावू पण यंदा शहरातील दहशत मोडूनच काढू. आमदार बदलायची वेळ आली आहे एमआयडीसी विकासासाठी आपण सर्व मिळून प्रयत्न करू.

### खा. सुप्रिया सुळे, खा. नीलेश लंके यांचे संदेश

तांत्रिक अडचणींमुळे खासदार सुप्रिया सुळे आणि खासदार नीलेश लंके यांचा थेट संवाद घडू शकला नाही. मात्र, त्यांनी संदेशाच्या माध्यमातून नगर एम आयडीसीमधील उद्योजकांना संबोधित करत औद्योगिक क्षेत्राच्या प्रगतीसाठी सुयोग्य नेतृत्व निवडण्याचे आवाहन केले. त्यांनी संदेशात म्हटले की, उद्योगांना प्रोत्साहन देणाऱ्या आणि औद्योगिक क्षेत्रात समृद्धी आणू शकणाऱ्या नेतृत्वाला निवडून द्या.

### कळमकरांचा पुढाकार आणि उद्योजकांच्या आशा

बैठकीत अभिषेक कळमकर यांनी एमआयडीसी क्षेत्रातील समस्यांचे निराकरण आणि औद्योगिक विकासासाठी निर्णायक योजना साकारण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी उपस्थित उद्योजकांनी कळमकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीने सकारात्मक बदलांची अपेक्षा व्यक्त केली.

# नगरकर धनशक्ती दडपशाहीला झुगारून लावतात हा इतिहास आहे

**माजी आमदार दादाभाऊ कळमकर**



नगर – नगर शहर विधानसभा मतदारसंघात अठरापगड पगड जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत. शहर बाजारपेठ, उद्योग धंदे यासाठी जितके नावाजले जाते तितकाच आपल्या शहराला सांस्कृतिक, कला क्षेत्रात अनेक दिग्गजांनी नगरचा नावलौकिक वाढवला. त्याचवेळी समाजाला दिशा देणाऱ्या सुसंस्कृत समाधुरीण, राजकारण्यांची मोठी परंपरा शहराचे वैशिष्ट्य आहे. शहराच्या राजकारणात अनेक दिग्गजांनी सक्रिय योगदान देत राजकारणाला एका उंचीवर नेऊन ठेवले. मी स्वतः नगरपालिकेपासून माझ्या राजकारणाचा श्रीगणेशा केला. पुढे कायम ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या सोबत विकासाचे राजकारण केले. सर्व समाजघटकांना एकत्र घेऊन चाललो. सन १९८५ च्या निवडणुकीत नगरकरांनी मला विधानसभेत प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली. त्या पाच वर्षांच्या काळात मी दूरदृष्टीने अनेक विकासकामे मार्गी लावली. सिद्धार्थ नगर परिसरात कष्टकरी वर्गाला हक्कांची घरे मिळाली. या दरम्यान विकासाच्या अनेक योजना मार्गी लावण्यात यश आले. झोपडपट्टीतील जनतेला न्याय हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. अल्पसंख्याक बांधवांसाठी काम केले.

दरम्यानच्या काळात शहरात हिंदुत्ववादी विचार सरणीचा पगडा वाढला, सलग पाच निवडणुकीत माझा शिवसेनेचे दिवंगत नेते अनिल राठोड यांनी माझा पराभव केला. पराभव झाला तरी विरोधी उमेदवार म्हणून आम्ही एकमेकांप्रती मनात कटुता ठेवली नाही. सुसंस्कृत राजकारण काय असते हे दाखवून दिले. पुढं ज्यांनी ज्यांनी माझ्या आमदारकीत आडकाठी आणली त्यांना सर्व जुने बाजूला ठेवून त्यांना महापालिकेतील सत्ता असो की आमदारकी मिळवून देण्यासाठी मी प्रामाणिकपणे काम केले. दरम्यानच्या काळात माझा पुतण्या जो आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा नगर शहरातील अधिकृत उमेदवार आहे, तो महापौर झाला. मुळातच तो अभ्यासू आणि सर्वांना सोबत घेऊन चालणारा आहे. मात्र भविष्यात स्पर्धक नको म्हणून त्याला त्रास देण्यात आला. परंतु तो डगमगला नाही. एका विचाराने त्याने राजकारण चालूच ठेवले. सातत्याने लोक संपर्क ठेवून त्याने नगरच्या विकासासाठी प्रयत्न केले.

परिणामी त्याने स्वतःच्या लोकप्रियतेच्या जोरावर आज आदरणीय नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून विधानसभेची उमेदवारी मिळवली आहे. त्याच्या प्रचाराला मिळणारा प्रतिसाद लक्षणीय आहे. समोर धनशक्ती आहे, पण जनशक्ती माझ्या त्याच्यामागे आहे. मी सुद्धा त्यावेळी विद्यमान मंत्र्याचा पराभव करूनच आमदार झालो होतो. नगरची जनता सतत धनशक्तीला व दडपशाहीला साथ देत नाही. हा इतिहास लक्षात घेतला पाहिजे. लोकांना गृहीत धरून राजकारणात कायम यशस्वी होता येत नाही. लोकांना आपलेसे करूनच राजकारणात यश मिळते. आज नगरकरांनी परिवर्तन करायचं मनोमन निश्चित केले आहे. त्याची प्रचिती निकालातून नक्की येईल व अभिषेक कळमकर नगरचे नवीन लोकप्रतिनिधी बनतील हा विश्वास आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी आमदार दादाभाऊ कळमकर म्हणाले.

